अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. २२ जून २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २६३ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८


## तेलंगवाडी व शेटफळ येथे घराचे कुलूप तोडून पावणेदोन लाखांचा ऐवज लंपास

**मोहोळ** : मोहोळ तालुक्यातील तेलंगवाडी व शेटफळ गावच्या हद्दीत अज्ञात चोरट्यांनी दिवसाच बंद घराचे कुलूप तोडून घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण १ लाख ७० हजार रुपयांचा ऐवज पळवून नेल्याची घटना २० जून रोजी सायंकाळी घडली.

याबाबत मोहोळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोहोळ तालुक्यातील तेलंगवाडी येथे ज्योतीराम राजाराम पवार हे कुटुंबासमवेत राहण्यास असून दि. २० रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या दरम्यान पवार पती-पत्नी शेतात गेले होते तर घरातील इतर लोक ही बाहेर गेले होते. याचीच संधी साधत अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करत कपाट उघडून त्यातील १ लाख ५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेले. ते सायंकाळी पाच वाजण्याच्या दरम्यान घरी आल्यानंतर चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांच्याप्रमाणे शेटफळ येथे राहणारे गणेश ज्ञानदेव राऊत यांच्याही घराचे कुलूप त्यांच्या घरातील ५० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व रोख १५ हजार रुपये असे चोरी झाल्याचे निदर्शनास आले. दोन्ही घरातील मिळून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण १ लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी पळवून नेल्याची फिर्याद ज्योतीराम पवार यांनी मोहोळ पोलीस ठाण्यात दिली असून त्यानुसार पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे अधिक तपास पोलीस कॉन्स्टेबल संतोष चव्हाण करीत आहेत.

# अजितदादांच्या नव्या 'गुगली'ने पवारांची पुन्हा उडणार 'दांडी'

## विरोधी पक्षनेतेपदावरून मुक्त करण्याची मागणी
## कमांड ठेवण्यासाठी प्रदेशाध्यक्षपदावर डोळा

सुराज्य/सोलापूर

**राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अजितदादा पवार यांनी पक्षाच्या मेळाव्यात बुधवारी एक नवा बॉम्ब टाकला. त्यातून राष्ट्रवादी काँग्रेसला जबर हादरा बसला. आपल्याला विरोधी पक्षनेतेपदातून मुक्त करा,अशी आर्त हाक त्यांनी पक्षाचे संस्थापक शरद पवार यांच्या समक्ष केल्याने पक्षातील ज्येष्ठ नेत्यांच्या भुवया उंचावल्या गेल्या. ही मागणी करून अजितदादांनी आपले मन मोकळे केले असले तरी त्यातून त्यांच्या मनात खदखदत असलेला अस्वस्थपणा बाहेर पडला आहे. याबाबत कानोसा घेतला असता अजितदादांना प्रदेशाध्यक्षपदाची आस लागली असून पक्षावर आपलीच कमांड असावी,अशी त्यांची मनोमन इच्छा असल्याचे सांगण्यात येते. पक्ष चालवताना काकांना पुतण्याकडे दुर्लक्ष करून चालत नाही. तेव्हा या मागणीवर पवारांची काय भूमिका घेणार? याविषयी राजकीय क्षेत्रात मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.**





झाले असे की- राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईत पवारांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसचा मेळावा भरवण्यात आला होता. त्यात अजितदादांनी मोठे वक्तव्य केले. मला विरोधी पक्षनेते पदावरून मुक्त करा. त्याऐवजी मला पक्ष संघटनेत हवी ती जबाबदारी द्या, असे म्हणताच मेळाव्यातील वातावरण एकदम स्तब्ध झाले.व्यासपीठावरील नेतेगण आश्चर्यचकित होवून एकमेकांकडे पाहू लागले. मी इतकी वर्षे या संघटनेत सगळीकडे काम करतोय. मला मंचावरील मान्यवरांना सांगायचं आहे की, मला विरोधी पक्षनेतेपदात फार काही रस नव्हता. परंतु आमदारांनी आग्रह केला, त्यांनी सह्या केल्या, त्यांच्या आग्रहाखातर मी हे पद स्वीकारले. तसेच नेते मंडळींनी पण सांगितले, अजित तू त्या ठिकाणी विरोधी पक्षनेता हो. त्यामुळे मी एक वर्ष झाले या पदावर काम करतोय, असेही ते म्हणाले.

### आता गचुरी धरू काय?

अजितदादा जसे मिश्किल स्वभावाचे, तसे ते आक्रमकही. ग्रामीण ढंगात टीकेचे घाव घालायलाही ते हयगय करत नाहीत.त्याचा एक अनुभव या मेळाव्यात आला. ते म्हणाले की- एक वर्ष झाले, मी विरोधी पक्षनेते पद सांभाळले. ते सांभाळत असताना आता काहींचे म्हणणे आहे की, मी कडक वागत नाही. आता मी काय त्यांची गचुरी धरू का? काय करू? कडक वागत नाही म्हणजे काय? ते कळत नाही. आता बास झाले. मला आता त्या पदाच्या जबाबदारीतून मुक्त करा आणि संघटनेची एखादी जबाबदारी द्या. मग कशा पद्धतीने पक्ष चालतोय बघा. योग्य वाटेल ते पद द्या. त्या पदाला मी न्याय देईन.

### प्रदेशाध्यक्षपदावर डोळा...

विरोधी पक्षनेतेपदावरून दूर करण्याची अजितदादांची मागणी म्हणजे त्यांचा प्रदेशाध्यक्षपदावर डोळा असल्याचे सांगण्यात येते. विद्यमान अध्यक्षा जयंत पाटील हे मागील पाच वर्षांपासून प्रदेशाध्यक्षपदावर कार्यरत आहेत. प्रत्येकी ३ वर्षांनंतर पद बदलण्याची पक्षाचा घटनेत तरतूद आहे. अजितदादांनी ही मागणी करून जयंतराव यांना शह दिल्याची पक्षात चर्चा आहे. अजितदादांचा प्रदेशाध्यक्षपदावर डोळा असल्याचे पवारांना ठाऊक होते. दोघांची कार्याध्यक्षपदी नियुक्ती करून पवारांनी अजितदादांना शांत करण्याचा प्रयत्न केला पण अजितदादांनी नवी 'गुगली' टाकल्याने पवारांनी पुन्हा 'दांडी' उडणार काय? असा प्रश्न समोर आला आहे.

### बीआरएस, वंचितकडे दुर्लक्ष नको...

अजितदादांनी पक्षाच्या नेत्यांना सूचक इशाराही दिला.ते म्हणाले की- मुख्यमंत्री केसीआर यांचा बीआरएस आणि प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित पक्षाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. काठावर पास होणारे आपले काही खासदार नापास झालेत. आगामी निवडणुकीत बारकाव्यांवरही नजर राहिली पाहिजे. केसीआर हे त्यांच्या राज्यापेक्षा महाराष्ट्रात अधिक लक्ष केंद्रीत करत आहेत. केसीआर यांनी आंबेडकर यांना कार्यक्रमाला बोलावले होते, या सर्व गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात.



जिथे मोदी तिथे विक्रम...

## योग दिनाची गिनिज बुकात नोंद

**न्यूयॉर्क** : पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकेच्या दौऱ्यावर आहेत. बुधवारच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थित संयुक्त राष्ट्र संघाच्या मुख्यालयात योगासने प्रात्याक्षिकांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला जगभरातील विविध देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. योग दिनाच्या कार्यक्रमात विविध देशांचे नागरिकत्व असलेली लोक पहिल्यांदाच इतक्या प्रमाणात सहभागी झाले होते.

हा देखील एक विक्रम आहे. त्याची दखल गिनिज बुक ऑफ रेकॉर्डसने घेतली. योग दिनाचा कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी पंतप्रधान मोदी यांनी छोटेखानी भाषण केले. त्यांनी म्हटले , ९ वर्षांपूर्वी या ठिकाणी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याचा प्रस्ताव सादर करण्याची संधी मिळाली होती. योग हा भारतातून आलाय, पण कॉपीराइट आणि पेटंट, रॉयल्टी मुक्त असल्याचे त्यांनी म्हटले.

कविता नगर पोलीस लाईन येथील घटना

## हवालदाराची गळफास घेऊन आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

ग्रामीण पोलीस दलातील एका ४६ वर्षीय हवालदाराने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना रविवार पेठेतील कविता नगर पोलीस लाईन येथे बुधवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली.



किरण अरुण साळुंखे (वय ४६ रा.कविता नगर पोलीस लाईन ब्लॉक नंबर ३९, रूम नं. १५०) असे मयताचे नाव आहे. आज दुपारी एक वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह बेडरूम मधील छताच्या पंख्याला लेगिनच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. किरण साळुंखे हे बार्शी पोलीस ठाण्यात हवालदार म्हणून नेमणूक होते. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा आणि १ मुलगी असा परिवार आहे. दोन दिवसापूर्वी त्यांची पत्नी दोन्ही मुलांना नणंदेच्या घरात सोडून इतर महिला सोबत चारधाम यात्रेकरिता गेल्या होत्या. त्यामुळे ते घरात एकटेच होते. त्यांचा घराचा दरवाजा उघडा असल्याचे पाहून आजूबाजूच्या लोकांनी पाहणी केली असता हा प्रकार उघडकीस आला. जेल रोडच्या पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह रुग्णालयाकडे पाठवून दिले. घटनेची नोंद जेलरोड पोलिसात झाली असून कारण समजले नाही. फौजदार राठोड हे पुढील तपास करीत आहेत.

## 'गोडसे आणि अखंड भारताचा विचार लक्षात ठेवणार'

सुराज्य/सोलापूर

नथुराम गोडसेला न्याय मिळाला नाही. आम्ही हिंदुस्थानी आहोत, लपून लपून स्टेट्स ठेवणारे जिहादी नाही आहोत. नथुराम गोडसे आणि अखंड भारताचा विचार आम्ही कायम लक्षात ठेवणार, असल्याचे ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी सांगितले.



महाराष्ट्र एसटी कर्मचारी सहकारी बँकेच्या निवडणुकीत ॲड. सदावर्ते यांनी स्वतःचे एसटी कष्टकरी संघर्ष पॅनेल उतरविले आहे. सोलापुरात पॅनेलच्या प्रचारासाठी आल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. यावेळी त्यांनी विरोधी पक्षनेते अजित पवारांवर टिका केली. सदावर्ते म्हणाले, अजित पवार हे कोणत्या बँकेमध्ये नोकरीला होते? अभियंता होते की डॉक्टर होते की माझ्यासारखे वकील होते? कुणी काही चुकीचे करत असेल तर, त्यावर तपास यंत्रणांना कारवाई करण्याचा अधिकार आहे. सदावर्ते पुढे म्हणाले, माझी पत्नी जयश्री पाटलांनी जशी माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या विरोधात केस चालवली तशी याही पुढे वेळ पडली तर चालवू. देशमुखाप्रमाणे बाकीच्यांनीही जेलमध्ये राहण्याची सवय करून घ्यावी, असेही ते म्हणाले.

एसटी कर्मचाऱ्यांच्या ७ वा वेतन आयोग आणि विलीनीकरण एकवेळेसच जाहीर होईल, याचा विश्वास आहे. पंतप्रधान मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात राज्य विकासाच्या मार्गावर अग्रक्रमाने पुढे जात आहे, असे सदावर्ते म्हणाले.

### नथुरामचा फोटो झळकावला

गुणरत्न सदावर्ते गेल्या काही दिवसापासून नथुराम गोडसे यांच्या फोटोमुळे अधिक चर्चेत आहेत. मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबरोबर नथुराम गोडसे यांचा फोटोही लावला होता. त्यानंतर यावरून चांगलीच टीका झाली होती. यानंतर आता पुन्हा एकदा राजकीय वातावरण गरम होण्याची शक्यता आहे. कारण सदावर्ते यांच्या सोलापूर येथील कार्यक्रमात पुन्हा एकदा नथुराम गोडसे यांचा फोटो झळकला आहे.

### मानवतेसाठी योग....

हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर हजारो साधकांच्या उपस्थितीत जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने योगा व प्राणायामाची विविध प्रात्यक्षिके करुन दाखवण्यात आले व त्याचे महत्त्व सांगण्यात आले.



## पती-पत्नीला डांबून ठेऊन जेसीबीने खोदला रस्ता

**कासेगाव येथील घटना; ४ महिलांसह १४ जणांविरुद्ध गुन्हा**

सुराज्य/सोलापूर

शेतातील वहिवाटीच्या कारणावरून पती-पत्नी यांना सळई आणि लाथाबुक्क्याने मारहाण करीत हातपाय बांधून रात्रभर डांबून ठेवले. त्यानंतर जेसीबीने रस्ता खोदून नुकसान केल्याची घटना कासेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथे नुकतीच घडली. या प्रकरणात सोलापूर तालुक्याच्या पोलिसांनी ४ महिला १० पुरुष अशा एकूण १४ जणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. यासंदर्भात बालाजी तानाजी जाधव (वय ४२ रा. कासेगाव) यांनी तालुका पोलिसात फिर्याद दाखल केली.

त्याप्रमाणे पोलिसांनी पंचाक्षरी गुंडप्पा भोज, अनिल भोज, सुनील भोज, महेश भोज, सागर भोज, संजय भोज, दादा भोज, अक्षय भोज, अंजू भोज, शोभा भोज, जया भोज, किसन शेटे आणि किसाबाई शेटे (सर्व रा. कासेगाव ता.दक्षिण सोलापूर) या १४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

बालाजी जाधव आणि त्यांची पत्नी शीतल असे दोघेजण शनिवारी रात्री शेताकडे निघाले होते. त्यावेळी वरील आरोपींनी त्यांना वाटेत अडविले. त्यानंतर जाधव दांपत्याचे हात पाय बांधून त्यांचे मोबाईल काढून घेतले आणि जेसीबीच्या सहाय्याने जाधव यांनी तयार केलेला रस्ता खोदून आर्थिक नुकसान केले. अशी नोंद पोलिसात झाली. पुढील तपास फौजदार जाधव करीत आहेत.

## दळवी खुनी हल्ला; पाचजणांना अटक

**बार्शी** : अवैध वाळू उपसा करणाऱ्याविरोधात शासनाकडे तक्रारी करत असल्याचा राग मनात धरून खांडवी ग्रा. पं.सदस्य आकाश दळवी वर प्राणघातक हल्ला केल्या प्रकरणातील पाच संशयित आरोपींना पोलिसांनी अटक केली. न्यायालयाने आरोपींना दि. २३ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

जातिवाचक शिवीगाळ करून आकाश दळवी व इतर दोघांना लोखंडी पाईप व काठयाने मारहाण केल्याप्रकरणी सहा जणांविरोधात खुनी हल्ल्याचा तसेच ॲट्रॉसिटी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल झाला होता. यातील आशुतोष वर दवाखान्यात उपचार सुरू असून इतर ५ जणांना पोलिसांनी अटक केली. अधिक तपास पोलीस उपअधीक्षक जालिंदर नालकूल करत आहेत. दरम्यान, आकाश दळवी यास बार्शी येथून पुढील उपचारार्थ सोलापूर येथे नेण्यात आले आहे.

### दळवीसह पाच जणांवर गुन्हा

तुझी आई ग्रामपंचायतमध्ये मला नेहमी विरोध करते असे म्हणून मुलावर तलवारीने वार करून मारहाण केल्याप्रकरणी पाच जणांवर जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा बार्शी तालुका पोलिसांत दाखल झाला आहे. आकाश पांडुरंग दळवी रा.खांडवी, बालाजी डोईफोडे रा.बार्शी, रामराजे चोरघडे, सचिन चोरघडे रा.खाडवी, प्रवीण भोसले रा बार्शी अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. दि. १९ रोजी पहाटे १ च्या सुमारास ही घटना घडल्याचे म्हटले आहे. आशुतोष उर्फ आश्रुबा बजरंग गव्हाणे वय ३६ रा खांडवी ता. बार्शी यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




तेवढाच धीर देऊयात !


कल्याण
280-03-346

मेन बाजार
147-20-677


## ७३ कोटींच्या पंढरपूर देवस्थान मंदिर विकास आराखड्यास मान्यता

सुराज्य/पंढरपूर

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पंढरपूर या तीर्थक्षेत्राचा विकास करण्यास राज्य शासनाने सर्वोच्च प्राधान्य दिले असून ७३ कोटी ८५ लाख ९५ हजारांच्या पंढरपूर देवस्थान मंदिर विकास आराखड्यास मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय नुकताच जारी करण्यात आला आहे. या निधीमुळे मंदिराचे प्राचीन सौंदर्य उजळून निघण्यास मदत होणार आहे.

तीर्थक्षेत्राच्या विकास आराखड्यासाठी १९ जुलै २०१६ च्या शासन निर्णयातील आराखड्याची कमाल किंमत मर्यादा २५ कोटी ही अट शिथिल करून पंढरपूर देवस्थान मंदिर विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे. आराखड्यात प्रस्तावित असलेली कामे दोन टप्प्यात ३१ मार्च २०२५ पर्यंत पूर्ण




करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

राज्य शासनाने मान्यता दिलेल्या ७३ कोटी ८५ लाख ९५ हजाराच्या पंढरपूर देवस्थान मंदिर विकास आराखड्यामध्ये मुख्य मंदिर व संकुलातील मंदिराचे जतन संवर्धनसाठी ५ कोटी ३ लाख ५८ हजार , रुक्मिणी मंदिर २ कोटी ७० लाख ५३ हजार, नामदेव पायरी व त्यावरील इमारतींचे नूतनीकरण ५ कोटी ५ लाख ५१ हजार ९७४ रुपये, महाद्वार व दोन्ही बाजूच्या पडसाळी ६ कोटी १८ लाख २३ हजार, लाकडी सभामंडप १ कोटी २५ लाख ७२१ रुपये, महालक्ष्मी मंदिर, व्यंकटेश मंदिर व मंदिरातील इतर इमारतींसाठी ३ कोटी ६९ लाख ७ हजार आणि मंदिरातील दीपमालासाठी २२ लाख २७ हजार. याबरोबरच आधीची विद्युत प्रणाली बदलून नवीन प्रणाली बसविण्यासाठी ५ कोटी ६७ लाख ११ हजार ९८० रुपये, जल व्यवस्थापनासाठी १ कोटी ५४ लाख ८ हजार, अभ्यागत सुविधेसाठी ६ कोटी ६८ लाख ९८ हजार ८७७ रुपये आणि मंदिरालगतच्या रस्त्याची दगडी फरसबंदी आणि सौंदर्यीकरण यासाठी ४ कोटी २० लाख ७२ हजार ९६० रुपयांचा समावेश आहे. तर जीएसटी सह अन्य करांसाठी २० कोटी ३३ लाख ८१ हजाराची तरतूद केली आहे.

**२८ मंदिरांचे जतन व संवर्धन होणार :** देवस्थान अखत्यारीतील मुख्य मंदिर समूहाच्या बाहेरील २८ परिवार देवतांच्या मंदिरांचे जतन व संवर्धन साठी ११ कोटी २७ लाखाची तरतूद केली आहे. यामध्ये श्री विष्णुपद मंदिर, श्री डगरी वरील विष्णुपद मंदिर, श्री विष्णू मूर्ती मंदिर, श्री मारुती मंदिर, श्री नारद मंदिर, श्री मारुतीचा पार, श्री रिद्धी सिद्धी गणपती मंदिर, श्री लक्ष्मण पाटील मंदिर, श्री शनि काळभैरव मंदिर, श्री शाकंभरी मंदिर, श्री खंडोबा मंदिर,श्री सोमेश्वर मंदिर, श्री रेणुका माता मंदिर, श्री यमाई तुकाई मंदिर, श्री यल्लमा देवी मंदिर , श्री पद्मावती मंदिर, तहसील कचेरी समोरील श्री मारुती मंदिर, व्यापारी कमिटी मारुती मंदिर, श्री रामबागेतील मारुती मंदिर, श्री व्यास नारायण मंदिर, श्री अंबाबाई मंदिर, श्री लखुबाई मंदिर, श्री सटवाई मंदिर, श्री रोकडोबा मंदिर, श्री त्र्यंबकेश्वर व खंडोबा मंदिर, श्री नरसोबा मंदिर, श्री पुंडलिक मंदिरासमोरील समाधी आणि श्री काळा मारुती मंदिराचा समावेश आहे.

# मैत्रीचे वास्तव...

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा अमेरिका दौरा धडाक्यात सुरू झाला. अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन आणि मोदी यांच्या भेटीकडे साऱ्या जगाचे लक्ष वेधले आहे. गेल्या अनेक वर्षांमध्ये खुद्द अमेरिकेच्या अध्यक्षांनी व प्रशासनाने जातीने लक्ष घातल्याचे, भारतीय पंतप्रधानांच्या दौऱ्याचे दुसरे उदाहरण आढळत नाही,असे जाणकार सांगतात.अमेरिकेच्या कायदेमंडळाच्या म्हणजे काँग्रेसच्या संयुक्त सभागृहांसमोर भाषण करण्याची संधी मिळणारे मोदी हे ब्रिटनचे म ाजी पंतप्रधान विन्स्टन चर्चिल, दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदविरोधी चळवळीचे अध्वर्यू नेल्सन मंडेला आणि अलीकडे युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की अशा अगदी मोजक्याच नेत्यांपैकी एक. भारताचे आंतरराष्ट्रीय राजकारण, अर्थकारणातील वाढता प्रभाव हे अर्थातच प्रमुख कारण. भारतीय अर्थव्यवस्था जगात पाचवी सर्वांत मोठी ठरते. जवळपास पावणे दोन ते दोन कोटींपर्यंत अनिवासी भारतीय ही भारताची सुप्तशक्ती किंवा 'सॉफ्ट पॉवर' ठरते. शिवाय भारत आणि अमेरिका हे दोन्ही देश अनुक्रमे जगातले सर्वांत जुने आणि सर्वांत मोठे प्रजासत्ताक लोकशाही मानले जातात. त्यामुळे असे काही धागे या दोन्ही देशांतील संबंधांची वीण घट करण्यात महत्त्वाचे ठरतातच. परंतु अलीकडच्या काळात चीनचा वाढलेला प्रभाव आणि रशियाची अनिर्बंध युद्धखोरी या दोन घडामोडींनी भारत-अमेरिका मैत्रीला नक्कीच वेगळे परिमाण प्रदान केलेले दिसून येते.चीनला सीमावादावरून थेट आणि सडेतोड स्वरूपात भिडणारा भारत हा सध्या एकमेव देश आहे. चीनशी सामरिक दोन हात करण्याची धमक आणि खुमखुमी असलेला अमेरिका हा दुसरा देश. त्यामुळे या दोन देशांमध्ये चीनला केंद्रस्थानी ठेवून विद्यमान साम रिक संबंध अधिक घनिष्ट होणे, हे स्वाभाविक आहे. मात्र भारताने



मर्यादित अलिप्ततावादाचे जुने, प्रस्थापित धोरण अद्याप त्यागलेले नाही. त्यामुळे दोन्ही देशांमध्ये सामरिक किंवा संरक्षण संबंध धीम्या गतीनेच पुढे सरकतील. अमेरिकेने भारताला ड्रोन सामग्री व तंत्रज्ञान आणि तेजस लढाऊ विमानाच्या दुसऱ्या आवृत्तीसाठी जीई कंपनीने बनवलेले जेट इंजिन सध्या देऊ केले असून, मोदींच्या विद्यमान दौऱ्यात त्यावर शिक्कामोर्तब होण्याची दाट शक्यता आहे. या ठिकाणी एक बाब लक्षात ठेवली पाहिजे. ती म्हणजे, अमेरिकेशी अजूनही थेट मोठ्या प्रमाणात युद्धसामग्री खरीदण्याची इच्छा भारताने दाखवलेली नाही. उलट तंत्रज्ञान हस्तांतरण आणि टप्प्याटप्प्याने सामग्री अधिग्रहण असेच भारत-अमेरिका सामरिक संबंधांचे स्वरूप राहील. रशियाकडून आजही भारताला मोठ्या प्रमाणात युद्धसामग्री मिळत आहे. शिवाय विद्यमान सामग्रीच्या देखभाल-दुरुस्तीसाठी पुढील अनेक वर्षे भारताला रशियावर अवलंबून राहावेच लागेल. भारताच्या सर्वांत मोठ्या संरक्षण सामग्री पुरवठादाराची जागा घेणे अमेरिकेला सध्या तरी शक्य नाही. परंतु भारतातील खासगी कंपन्यांच्या सहकार्याने आणि भारत सरकारच्या देखरेखीखाली वाहतूक, टेहेळणी, उपग्रह आदी क्षेत्रांमध्ये महत्त्वाचे तंत्रज्ञान विकसित करून चीनच्या विरोधात अधिक सुसज्ज होण्यासाठी अमेरिकेची मदत भारताला निश्चितच होईल,असे जाणकार सांगतात. अमेरिकेत रिपब्लिकन पक्षाचा अनिवासी भारतीयांमध्ये मोठा जनाधार आहे. परंतु डेम ोक्रॅटिक पक्षामध्ये तो तितका नाही. बिल क्लिंटन, बराक ओबामा, हिलरी क्लिंटन, जो बायडेन या अध्यक्षांचे भारतीय पंतप्रधानांशी अतिशय सौहार्दपूर्ण संबंध राहिले आहेत. परंतु भारतातील धार्मिक असहिष्णुता आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्यावरील निर्बंधांविषयी प्रामुख्याने डेमोक्रॅटिक नेत्यांनी वेळोवेळी प्रश्न उपस्थित केले आहेत. धार्मिक स्वातंत्र्याच्या निकषावर भारताचे अवमूलन अलीकडेच अमेरिकी काँग्रेसच्या समितीने केले होते. ते आक्षेप अद्याप मागे घेण्यात आलेले नाहीत. भारत-अमेरिका मैत्री ही पूर्वीपेक्षा कितीतरी अधिक वाढली हे वास्तव जगाला आता नाकारताच येणार नाही.

## सामाजिक

> भारतीय जनता पक्षाच्या विरोधात देशातील सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येऊन आगामी लोकसभा निवडणूक लढवावी म्हणजे भाजपचा पराभव करणे शक्य होईल, असे राहुल गांधींपासून नितीशकुमार, शरद पवारांपर्यंत सारे विरोधी नेते एका सुरात बोलत आहेत. महाराष्ट्रात महाविकास आघाडी आगामी विधानसभा व लोकसभा निवडणुकीपर्यंत तरी एकत्र असणार आहे का, हे सुद्धा ठामपणे सांगता येत नाही, मग देशपातळीवर भाजपचा पराभव व्हावा म्हणून देशव्यापी विरोधी पक्षांचे ऐक्य कितपत शक्य आहे?

# विरोधकांचे ऐक्य सोपे नाही...

लोकनायक जयप्रकाश नारायण यांनी पाच दशकांपूर्वी काँग्रेसच्या विरोधात विरोधी पक्षांना एकत्र आणले होते. दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी लागू केलेल्या आणीबाणीच्या कालखंडात १९७५ ते ७७ या काळात सोळा महिने काँग्रेस विरोधी नेते जेलमध्ये होते. त्यामुळे सर्व विरोधकांची मानसिकता काँग्रेसचा पराभव करण्यासाठी एकत्र येऊन लढण्याची झाली होती. आता जयप्रकाश नारायण यांचे शिष्य म्हणविणारे मुख्यमंत्री नितीशकुमार हे भाजपच्या विरोधात विरोधी पक्षांचे ऐक्य घडविण्यासाठी धडपड करीत आहेत. केंद्रात व राज्यात सत्ता मिळविण्यासाठी सत्तेच्या परिघात राहण्यासाठी याच नितीशकुमार यांनी आजवर पाच वेळा इकडून तिकडे उड्या मारल्या आहेत. बिहारमध्ये तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्री व्हायचे आहे, म्हणून राजदचा स्वार्थ समजू शकतो. पण नितीशकुमार यांना विरोधकांच्या ऐक्यासाठी एवढी घाई कशासाठी झाली आहे? कर्नाटकमध्ये भाजपला हटवून काँग्रेसची सत्ता आली, यामुळे नितीशकुमार यांना जोर चढला आहे. सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येऊन २०२४ च्या निवडणुकीतील पंतप्रधानपदाचा उमेदवार म्हणून आपले नाव जाहीर व्हावे ही त्यांची सुप्त इच्छा आहे.

पाटण्यातील मेळाव्याला काँग्रेसच्या वतीने कोण हजर राहणार याची सर्वच राजकीय पक्षांना उत्सुकता आहे. विरोधकांच्या ऐक्यासाठी दुसऱ्या कोणी पुढाकार घेतला, तर काँग्रेसकडून फारसा प्रतिसाद दिला जात नाही. हा आजवरचा अनुभव आहे. अगोदर भारत जोडो यात्रा व नंतर हिमाचल प्रदेश आणि कर्नाटकमध्ये काँग्रेसला मिळालेला विजय, यानंतर राहुल गांधी यांचे राजकीय वजन वाढले आहे. पूर्वीचे राहुल व आताचे राहुल यात मोठा फरक आहे. पंतप्रधानपदाचा उमेदवार म्हणून दुसऱ्या कोणाचे नाव जाहीर होणे हे काँग्रेसला कधीच मान्य होणार नाही. नितीशकुमार यांनी



बोलविलेल्या बैठकीला राहुल गांधी किंवा मल्लिकार्जुन खरगे राहतील का?

निवडणुकीच्या जागा वाटपात काँग्रेस पक्ष त्या त्या राज्यात प्रबळ असलेल्या प्रादेशिक पक्षांपेक्षा कमी जागा स्वीकारायला तयार होईल का? गेल्या महिनाभरात नितीशकुमार यांनी ममता बॅनर्जी, शरद पवार, केसीआर, अरविंद केजरीवाल, मल्लिकार्जुन खरगे, उद्धव ठाकरे आदी विरोधी नेत्यांच्या व्यक्तिश: भेटी घेतल्या. भाजप हटाव हाच सर्वांचा अजेंडा आहे. केवळ भाजप हटाव या एकाच मुद्द्यावर विरोधी पक्षांचे ऐक्य घडू शकेल का? दि. ५ जून १९७४ रोजी पाटण्यातील गांधी मैदानावरून जयप्रकाश नारायण यांनी संपूर्ण क्रांतीची घोषणा केली. काँग्रेसला सत्तेवरून खाली खेचण्याचा संकल्प केला होता. पाटण्यातील याच गांधी मैदानावर विरोक्षी पक्षांचे शक्तिप्रदर्शन घडविण्यासाठी व भाजपला सत्तेवरून खाली खेचण्याचा संकल्प जाहीर करण्यासाठी नितीशकुमार आतुर झाले आहेत. नितीशकुमार यांचे राजकारण सत्ताकेंद्रित असते. अटलबिहारी वाजपेयींपासून नरेंद्र मोदींपर्यंत ते कसे त्यांच्याभोवती पिंगा घालत होते हे ममता बॅनर्जी व काँग्रेसच्या नेत्यांनी पाहिले आहे. जयप्रकाश नारायण यांनी पन्नास वर्षांपूर्वी संपूर्ण क्रांतीची घोषणा केली व त्यांच्या प्रेरणेतूनच काँग्रेसला सत्तेवरून हटविण्यासाठी जनता पक्ष स्थापन झाला. डावे, उजवे, समाजवादी सारे विरोधक जनता पक्षात सामील झाले होते. भारतीय जनसंघही जनता पक्षात सामील झाला होता. जनता पक्षाचे केंद्रात व अनेक राज्यांत सरकार आले, पण स्वत: जयप्रकाश नारायण हे पंतप्रधान झाले नाहीत किंवा सत्तेच्या परिघात राहिले नाहीत. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंप्रमाणे हे त्यांचे वेगळेपण म्हणावे लागेल. विरोधकांच्या ऐक्यासाठी पुढाकार घेणारे व भाजपच्या विरोधात वन टू वन लढू म्हणणारे नितीशकुमार हे कोणी जयप्रकाश नारायण नाहीत. ते सत्तेपासून दूर राहू शकत नाहीत हा त्यांचा आजवरचा राजकीय प्रवास आहे.

लोकसभेच्या ५४३ जागांपैकी १९० जागांवर भाजप विरुद्ध काँग्रेस अशी थेट लढत आहे. अन्य प्रादेशिक पक्षांचे तिथे काही काम नाही. या जागांपैकी ९२ टक्के जागांवर भाजपचे खासदार निवडून आले आहेत. याचा अर्थ १७५ जागांवर भाजपचे खासदार आहेत. काँग्रेसचे केवळ १५ खासदार येथे आहेत. लोकसभेच्या १८५ जागा अशा आहेत की, तेथे भाजपची लढाई बिगर काँग्रेस पक्षांबरोबर आहे. त्यातील १२८ जागांवर भाजपचे खासदार आहेत, तर ५७ जागांवर अन्य पक्षांचे खासदार निवडून आले आहेत. देशातील ७१ लोकसभा मतदारसंघांत काँग्रेसची लढाई बिगर भाजप पक्षांबरोबर आहे. त्यात ३७ मतदारसंघांत गेल्या वेळी काँग्रेसचा विजय झाला, तर ३४ मतदारसंघांत अन्य प्रादेशिक पक्षांचा विजय झाला. मध्य व उत्तर भारतातील बारा राज्यांत व तीन केंद्र शासित प्रदेशात लोकसभेच्या १६१ जागा आहेत. यामध्ये १४७ मतदारसंघांत काँग्रेस विरुद्ध भाजप अशी थेट लढत आहे. बारा जागांवर काँग्रेस किंवा भाजप यांना प्रादेशिक पक्षांशी सामना करावा लागणार आहे.

नितीशकुमार यांचा वन टू वन फॉर्म्युला २०२४ च्या निवडणुकीत वास्तवात उतरेल का? हाच कळीचा मुद्दा आहे. विविध राज्यांतील दोन डझन विरोधी पक्ष भाजपच्या विरोधात एकत्र येऊन निवडणूक लढवतील का? नवीन संसद भवनाच्या उद्घाटनाला माजी पंतप्रधान व जनता दल सेक्युलरचे प्रमुख एच. डी. देवेगौडा, वायएसआर काँग्रेसचे प्रमुख के. जगमोहन रेड्डी, तसेच बीजू जनता दल व शिरोमणी अकाली दलाचे नेते उपस्थित होते. बसपाच्या नेत्या मायावती यांनीही आपला शुभ संदेश पाठवला होता. विरोधकांकडे सर्वमान्य नेता नाही आणि जागा वाटपात मतैक्य होण्याची शक्यता नाही.

**- डॉ. सुकृत खांडेकर**

## टुडेज् ब्लॉग

# तरूण मुलं व्यवहारात ढं

पालकांनो मुलं लुळीपांगळी करू नका.... सहज चप्पल दुकानामध्ये बसलो होतो. माझ्याच मित्राचा मुलगा चप्पल खरेदीसाठी आला. त्याने एम फार्मसी मध्ये टॉप केलेलं. खरंच खुप हुशार होता. अनेक प्रकारच्या चप्पल बघून एक निवडली. किंमत विचारली दुकानदाराने चारशे पंचवीस सांगितली. तो म्हणाला खुप महाग सांगताय. चारशे पंधराला द्या. दुकानदाराने आनंदाने पॅकिंग करून दिली. मला आश्चर्य वाटले. म्हणजे त्याच्याकडे आर्थिक साक्षरता नावालाही नाही का? मी स्वतः ती चप्पल दोनशे ते तीनशेला मागितली असती. अशी परिस्थिती अनेक ठिकाणी पाहतो.

तरुण मुलं म्हणजे देशाची आशा आणि अपेक्षा. आजची तरुण पिढी ही पुढारलेली, हुशार आणि ॲडव्हान्स आहे. काहीतरी करून दाखविण्याची धमक या तरुणाईच्या नसांनसांमध्ये भिनली आहे. परंतु अशी काही उदाहरणे पाहिली की खरोखरच ही मुलं प्रत्यक्ष व्यवहारात ढ च आहेत. कारण यांचा प्रत्यक्ष व्यवहार व पैशाचा संबंध अलीकडे इंटरनेट, फोन बँकिंगमुळे येतच नाही. त्यामुळे बाजारातील वस्तू, त्याची किंमत, स्थिती कशी माहीत होईल. लहान लहान व्यवहारातही फसतात. पैसा कसा वाचवायचा? कुठे गुंतवणूक करायची? आणि व्यवहार कसे करायचे ? हेच माहिती नाही. त्यात जास्तच भर घातली ती कोरोनाने. अनेक तरुण मुलांना बँकेत विड्रॉअल स्लिप ओळखता व भरता येत नाही. साधा अर्ज करता येत नाही. चेक ओळखता येत नाही आणि भरताही येत नाही. डीडी विषयी तर बोलूच नये. देशाच्या, राज्याच्या अर्थव्यवस्थे विषयी मोठमोठ्या गप्पा मारतील पण बजेट समजत नाही. एक रुपया कसा येतो व कसा जातो या विषयी माहिती नाही. व्याज काढता येत नाही. सगळ्यात महत्वाचं म्हणजे हिशेब लिहिता येत नाहीत. दहा, वीस, पन्नासशंभर रूपायाची किंमत त्यांच्या जवळ नाही. अशी परिस्थिती आजच्या तरुण मुलांची.



छानछोंकी आणि मोबाईल यात तरुण मुलं असे गुरफटू लागलेत की त्यांना आईच्या कंबरेवर पाण्याचा हंडा किंवा बापाचे कष्ट दिसतच नाही मग व्यवहाराचे तर लांबच. याला कारणीभूत आहे पालकच. रक्ताचं पाणी करून, हाल अपेष्टा सहन करून, उसनवारी करून मुलांना शिकवतात. आपली जिंदगी बर्याच झाली पण मुलांची व्हायला नको म्हणून पाहिजे ते मुलांना देतात. कधीच बाजाराला, बाहेर कुठे एकट्याला पाठवत नाहीत. थांब बस घरीच. मीच जातो बॅकेत, पोस्टात. मुलं स्वतः ही हट्ट करत नाहीत. मग व्यवहार ज्ञान कसे येईल. आर्थिक व्यवहाराच्या बाबतीत पालकांनी मानसिकदृष्ट्या आपली मुलं लुळीपांगळी केली आहे. आज सर्व ठिकाणी प्रवेश प्रक्रिया चालू आहे. तिथेही पालकच पुढे. अगदी फॉर्म भरणे, कागदपत्रे झेरॉक्स करणे, फी भरणे हे सर्व. आज तीसरा प्रकार अस्तित्वात आला आहे तो म्हणजे शिकलात पण अडाणी आहे. पैसे असतील तर म्युच्युअल फंड, विमा, शेअर्स या विषयी माहिती नाही.

आज समाज, परिस्थिती बदलत आहे त्यामुळे आपलं भविष्य उज्वल करायचं असेल तर त्यासाठी व्यवहाराच्या अनेक वाटा आणि उपवाटा आहेत. त्यातली एखादी वाट आपली वाट बघत थांबलेली आहे. मुलांवर विश्वास ठेवा. स्वतः ला करू द्या किंवा करायला सांगा. त्यांचे त्यांना निर्णय घ्यायला सांगा. एकदादोनदा चुकतील नाहीतर आपण आहोतच. तरच भविष्यात पुढे मुलं टिकतील अन्यथा लुळीपांगळी तर करतोयच......

**- प्रा. तात्यासाहेब काटकर, अकलूज**

## जन्म हा अखेरचा

# वाणी संतांची

हो कां जयाचिया प्रीती । अमूर्त हा आला व्यक्ती । मज एकवंकी याची स्थिती । आवडतु असे ।।

पहा की, ज्याच्या प्रीतीकरिता निराकार साकार झाला, यावरून मला तर असे वाटते की, या दोघांची स्थिती (देह) जरी भिन्न आहे, तरी दोघे एकरूपच आहेत.

एऱ्हवीं हा योगियां नाडळे । वेदार्थासी नाकळे । जेथ ध्यानाचेही डोळे । पावतीना ।।


एऱ्हवी हा भगवान योग्यांना आढळत नाही, वेदार्थालाही ज्याचे आकलन होत नाही व ज्याचे ठिकाणी ध्यानाची दृष्टी पोहोचत नाही.

तो हा निजस्वरूप । अनादि निष्कंप । परी कवणें मानें सकृप । जाहला आहे ।।

असा जो आत्मस्वरूप, अनादी, अविक्रिय भगवान तो अर्जुनावर किती कृपावंत झाला आहे!

हा त्रैलोक्यपटाची घडी । आकाराची पैलथडी । कैसा याचिये आवडी । आवरला असे ।।

हा त्रैलोक्यरूप वस्त्राच्या संकोचविस्ताराचे अधिष्ठान आहे. (त्रैलोक्य हे याचे रूप असून त्याची घडी करून हा अवतार घेऊन आला आहे.) आणि आकाराच्या पलीकडला म्हणजे निराकार असून हा अर्जुनाला इतक्या प्रेमाने कसा स्वाधीन झाला नकळे !



मग देव म्हणे अगा पंडुसुता । हाचि योगु आम्हीं विवस्वता । कथिला परी ते वार्ता । बहुतां दिवसांची ।।

मग श्रीकृष्ण अर्जुनास म्हणाले :- ज्याचा उपाय कर्मयोग आहे असा हा ज्ञानयोग आम्ही पूर्वी विवस्वानाला - सूर्याला सांगितला; परंतु त्या गोष्टीला खूप दिवस झाले.

मग तेणें विवस्वतें रवी । हे योगस्थिति आघवी । निरूपिली बरवी । मनूप्रती ।।

सूर्याने हा सर्व योग वैवस्वत मनूला सांगितला;

मनूनें आपण अनुष्ठिली । मग इक्ष्वाकुवा उपदेशिली । ऐसी परंपरा विस्तारिली । आद्य हे गा ।।

आणि मनूने त्याचे आचरण करून इक्ष्वाकु नामक आपल्या पुत्रास त्याचा उपदेश केला. अशी ही मुळापासून परंपरा चालत आली आहे.

## जनमानस

# पाऊस लांबला; बळीराजाची चिंता वाढली

यावर्षी सरासरीपेक्षा कमी आणि उशिरा पाऊस येईल, असे भाकीत भारतीय हवामान खात्याने तसेच स्कायमेटने वर्तवले होते. आज ते भाकीत खरे ठरताना दिसत आहे कारण दरवर्षी ७ जूनला येणारा मान्सून अजूनही आलेला नाही. बीपरजॉय चक्रीवादळामुळे मान्सून लांबला असल्याचे कारण या क्षेत्रातील तज्ज्ञ देत आहे. आता २३ जूनला मान्सूनचे आगमन होईल असे हवामान खात्याने सांगितले आहे हा अंदाज खरा ठरावा आणि वरून राजाने कृपा करावी यासाठी बळीराजाने देव पाण्यात बुडवले आहेत. कारण आपल्या देशातील बहुतांशी शेती ही पावसावर आहे. सुमारे ६० टक्क्यांहून अधिक शेती पावसावर अवलंबून असल्याने बळीराजाचे डोळे पावसाकडे लागले आहेत. पाऊस लांबल्याने पेरणी लांबली आहे. पेरणी लांबल्याने शेतीचे वेळापत्रकच कोलमडून पडले आहे गेल्या काही वर्षात हे चित्र सातत्याने पाहायला मिळत होते यावर्षी तेच



होणार असे एकंदरीत दिसत आहे. यावर्षी जून महिन्याच्या सरासरी १० टक्के इतकाही पाऊस झालेला नाही. राज्यातील खरीप पिकाच्या एकूण क्षेत्रापैकी ०.७७ टक्केच म्हणजेच केवळ १ टक्के क्षेत्रावरच पेरणी झाली आहे. राज्यात खरीप पिकाचे सरासरी क्षेत्र १४२.०२ लाख हेक्टर असून ऊस पिकासह हे सरासरी क्षेत्र १५२. ९७ लाख हेक्टर आहे. पाऊस लांबल्याने आता क्षेत्रात पेरणी देखील रखडली आहे. जर हीच परिस्थिती कायम राहिली आणि पावसाने ओढ दिली तर त्याचा परिणाम केवळ खरीप हंगमावरच नाही तर रब्बी हंगामांवर देखील होऊ शकतो. पाऊस लांबल्याने कृषी उत्पादनाची टक्केवारी अर्थातच कमी होण्याची शक्यता आहे. पाऊस कमी झाला की, महागाई वाढते हे समीकरणच आहे. महागाई वाढली की त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. यावर्षी पाऊस लांबल्याने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न देखील निर्माण होऊ शकतो? देशातील बावीस कोटी जनावरांचा चारा पावसावरच अवलंबून आहे. जर वेळेत आणि पुरेसा पाऊस झाला नाही तर या जनावरांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिह निर्माण होऊ शकते. पोटच्या लेकरांप्रमाणे वढवलेले

**- श्याम ठाणेदारें दौंड**

# शिवसेना बंडाची वर्षपूर्ती

दिनांक २० जून २०२२ याच दिवशी शिवसेनेच्या इतिहासातल्या सर्वात मोठ्या बंडाची पहिली ठिणगी पडली. या बंडाला एकनाथ शिंदे आणि त्यांच्या समर्थक नेत्यांनी हे 'बंड' नव्हतं तर तो एक 'उठाव' असल्याचा दावा करून नाण्याची दुसरी बाजू मांडली. त्यावर अनेक बाजूंनी खल झाला. राजकीय निरीक्षकांनी विश्लेषणं केली, पुस्तकं लिहिली. प्रत्येकानं आपल्याला जे दिसलं, जे अनुभवता आलं ते लिहिलं. त्यावर भाष्य केलं. पण अजूनही शिवसेनेतल्या त्या ऐतिहासिक बंडावर बोलणं थांबत नाहीय. कारण सध्याच्या राज्यातल्या राजकारणात हे 'बंड' किंवा हा 'उठाव' उद्याच्या सत्ताकारणाची गणितं ठरवणारा आहे. जवळपास ४० आमदारांची ताकद शिंदे गटाकडे आली आणि तेवढ्या आमदारांची ताकद एकत्र आल्यानंतर आम्हीच खरी शिवसेना हा दावा शिंदे आणि त्यांच्या समर्थक चाळीस आमदारांनी केला. आणि तिथूनच सुरु झाला शिवसेनेतला खरा राजकीय संघर्ष.

हा संघर्ष सत्तेचा होता, हा संघर्ष पक्षाचा होता, पक्षचिन्हाचा होता, विचारांचा होता. तसंच आमदार-खासदारांपासून तळगाळातला कार्यकर्ताही आपल्यासोबत राहावा यासाठीचाही तो संघर्ष होता. शिवाय मूळ शिवसेना पक्षाशी निगडित असलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याला हा संघर्ष आपल्या अस्तित्वाचा वाटू लागला होता आणि त्या संघर्षातूनच एक भावनिक वातावरणही निर्माण झालं. ते एकीकडे अजूनही कायम आहे, तर दुसरीकडे कायद्याच्या कसोटीवरही तब्बल नऊ महिने सर्वोच्च न्यायालयात सत्तासंघर्ष सुरू राहिला. सुनावण्यावर सुनावण्या होत राहिल्या आणि तारखांवर तारखा मिळत गेल्या. त्याआधी निवडणूक आयोगाच्या दारात हे दोन गट उभे राहिले. हजारो कार्यकर्त्यांनी शपथपत्रं दिली. त्यांचे गठ्ठेच्या गठ्ठे निवडणूक आयोगात सादर झाले. या लढाईत उद्धव ठाकरेंकडून पक्षाचं नाव गेलं आणि धनुष्यबाण हे चिन्हही. 'शिवसेना' हे नाव आणि 'धनुष्यबाण' हे पक्षचिन्हही शिंदेंच्या गटाला मिळालं. त्याआधी ४० आमदार, १३ खासदार, कार्यकर्ते आणि पदाधिकारी आपल्या बाजूनं वळवण्यात एकनाथ शिंदेंना यश मिळालं होतं. मूळ शिवसेनेतली नेतेमंडळी आपल्या बाजूनं आणण्याचं शिंदेंचं मॅजिक अगदी वर्षपूर्ती होत असतानाही कायम आहे. अगदी कालपरवा शिंदेंच्या शिवसेनेत आलेल्या मनीषा कायंदेच बघा ना.

शिवसेनेत दोन गट निर्माण झाल्यानं राज्यातल्या अनेक कुटुंबांमध्येही सुद्धा विभागणी झालीय. कोणाचे वडील शिंदेंसोबत आहेत तर चिरंजीव ठाकरेंसोबत. कोणाचे चिरंजीव शिंदेंसोबत आहेत तर वडील ठाकरेंसोबत आहेत. अगदी भावाभावांमध्येही विभागणी झालीय.




गेल्या वर्षभरात ठाकरे आणि शिंदे गटांमध्ये एकमेकांवर टीका झाल्यानं त्यांच्यातील वादही विकोपाला गेले आहेत. अगदी खालच्या पातळीला जाऊन वर्षभर एकमेकांवर शाब्दिक चिखलफेकही झाली. आणि वर्षपूर्ती होत असतानाही ही शाब्दिक चिखलफेक पुढे सुरू राहील अशी सध्याची स्थिती आहे. शिवसेनेच्या इतिहासात याच वर्षभरात पहिल्यांदाच दोन 'दसरा मेळावे' झाले, आणि आता 'शिवसेना वर्धापन दिन' साजरा करण्यासाठी दोन सोहळेही झाले. दोन्ही कार्यक्रमात दोन्ही पक्षांकडून मोठं शक्तिप्रदर्शन झालं. वर्षभरात दोन्ही गटांनी एकमेकांना कोंडीत पकडण्याचा कुठलीही संधी सोडली नव्हती. आधीच विकोपाला गेलेला हा संघर्ष आता आगामी निवडणुकांच्या काळात पराकोटीला पोहोचणार अशी चिन्ह आहेत.

या वर्षभरात उद्धव ठाकरेंशी फारकत घेऊन अनेक नेते आणि पदाधिकारी शिंदेंसोबत गेले. ते का गेले? याची प्रत्येकानं दिलेली कारणं वेगवेगळी आहेत. पण त्यांनी यापुढे शिंदेंच्या शिवसेनेला खरी शिवसेना मानून राजकारणात आपलं अस्तित्व टिकवण्याचं ध्येय ठेवलंय. आता जी मंडळी ठाकरेंसोबत राहिली, ती का राहिली ? याची त्या प्रत्येकानं वेगळी कारणं दिली आहेत. आता तेही उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला निष्ठावंतांची शिवसेना मानून आपलं अस्तित्व टिकवण्यासाठी प्रयत्न करणार आहेत. वर्षभरात घडलेल्या सगळ्या घडामोडी बघितल्या तर नेमकं चुकलं कोणाचं ? एकनाथ शिंदेंचं की उद्धव ठाकरेंचं ? यामध्ये दोन वेगवेगळे मतप्रवाह वेगवेगळी उत्तरं देतील. यापुढे कोणी विचाराचा वारसा जपण्याचा प्रयत्न करेल तर कोणी सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न करेल. पण या 'बंडा'च्या किंवा 'उठावा'च्या वर्षपूर्तीनंतरही 'कोणता झेंडा घेऊ हाती?' हा प्रश्न शिवसेना या नावाशी जोडलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याला पडलेला पाहायला मिळेल. कारण या संघर्षातली हार जीतच खरी शिवसेना ठरवेल आणि खऱ्या शिवसेनेचा 'भगवा' महाराष्ट्रात फडकवेल.

**-वेदांत नेब**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# प्राचीन भारतीय योग शास्त्राला जीवनाचा भाग बनवा : ठोंबरे



सुराज्य/सोलापूर

योग हा ध्यान आणि व्यायामापुरतता मर्यादित नसून अध्यात्माच्या सर्व प्रकारच्या शक्यतांची ओळख करून देणारे अत्यंत प्राचीन असे शास्त्र आहे. भारताला याचा अत्यंत समृध्द वारसा लाभला आहे. योगाच्या परंपरेचे संवर्धन आणि जतन केले पाहिजे, योगाला आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवा, असे आवाहन प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी येथे केले.

सोलापूरातील हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर नवव्या आंतरराष्ट्रीय योग दिन भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्युरो, जिल्हा व पोलीस प्रशासन आणि योग समन्वय समितीच्यावतीने आयोजित कार्यक्रमात प्रभारी जिल्हाधिकारी ठोंबरे बोलत होते. खासदार डॉ जयसिध्देश्वर महास्वामी यांच्या हस्ते योग दिनाच्या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलनने उद्घाटन करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर पोलीस आयुक्त राजेंद्र माने, महानगरपालिका आयुक्त शीतल तेली-उगले, क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंकुश चव्हाण, राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक नितीन धार्मिक, जिल्हा क्रीडा अधिकारी नितीन तारळकर, शिक्षणाधिकारी सुलभा वठारे, महाव्यवस्थापक विनोद तावरे, ह. दे. प्रशालेचे प्राचार्य प्रकाश कांबळे, योग संस्था निमंत्रक मनमोहन भुतडा, मुख्य समन्वयक सुधा अळळीमोरे, एन.सी.सी. बटालियन ३८ चे सुभेदार मेजर अरुणकुमार ठाकूर, अजितकुमार, सेवानिवृत्त अधिकारी सतीश घोडके आणि सहायक क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंबादास यादव उपस्थित होते. यावेळी प्रास्ताविक अंकुश चव्हाण यांनी केले.

एन एन सी ३८बटालियनची विद्यार्थीनी अमृता गुंफेकर ने म्युझिकल योगाच्या माध्यमातून अतिशय अवघड अशा कसरती करून उपस्थितांची मने जिंकली. विवेकानंद केंद्राच्या वतीने दिपाली कुलकर्णी यांनी पाठीवरील योगासने घेतली.

पतंजली योग पिठाच्या वतीने सुजाता सुतार यांनी प्राणायाम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजाता शास्त्री यांनी केले. अंबादास यादव यांनी आभार मानले. यावेळी पतंजली योगपीठाचे रघुनंदन भुतडा, प्रभाकर जाधव, योग असोसिएशनचे डी एम वेदपाठक, विवेकानंद केंद्राचे नंदकुमार चितापूरे, डॉ शोभा शहा, भारतीय योग संस्थाचे दत्तात्रय चिवडशेट्टी, राजशेखर लशमेश्वर, योग सेवा मंडळाचे सुनील आळंद, संतोष सासवडे, योग साधना मंडळाचे नागनाथ पाटील, रमेश सोनी, रुद्र अकादमी ऑफ मार्शल आर्ट अँड योगच्या संगीता जाधव, हार्टफुलनेस इन्स्टिट्यूट प्रमोद पाटील, भारत स्काउट गाईडचे श्रीधर मोरे, अनुसया सिरसाठ, एन.सी.सी. बटालियन ३८ चे सुभेदार अण्णाराव वाघमारे, सुभेदार रामचंद्र, हवालदार मनीषकुमार आदी संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

### योग काळाची गरज : अळ्ळीमोरे

योग काळाची गरज बनली आहे. योग केल्याने तन आणि मनच शुद्ध होत नाही तर योग सर्वधर्म मानणारा आहे. मानव धर्माला निरोगी करण्यासाठी योगाच्या माध्यमातून आपला समाज, राष्ट्र ,विचार आणि संस्काराने निरोगी करणारा हा योग असल्याचे मत पतंजली योग समितीच्या महाराष्ट्र महिला प्रभारी व मुख्य समन्वयक सौ. सुधाताई अळ्ळीमोरे यांनी व्यक्त केले.



## डीसीसी बँक कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करू : आ. राऊत

बार्शी : सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी व येथील बँक कर्मचारी यांनी आमदार राजेंद्र राऊत यांची भेट घेवून कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांसदर्भात चर्चा केली. बँक कर्मचाऱ्यांचे प्रश्नांची सोडवणूक करण्याचे आश्वासन यावेळी आमदार राऊत यांनी पदाधिकारी व कर्मचारी यांना दिले. पदाधिकारी व बँक कर्मचारी यांनी हक्क रजेचा पगार, पगारवाढ, प्रमोशन व इतर मागण्या संदर्भात आ. राऊत यांची भेट घेवून मागण्या मार्गी लावण्याची मागणी केली. आ. राऊत यांनी पदाधिकारी व कर्मचारी यांचे म्हणणे ऐकून घेवून जिल्हा बँकेचे प्रशासक कुंदन भोळे यांच्याशी हक्क रजेच्या पगार अदा करण्याच्या अनुषंगाने चर्चा केली. तसेच जिल्हयातील नेतेमंडळींशी चर्चा करून त्यांच्या इतरही मागण्या मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. यावेळी शिवकुमार गाढवे, राहुल खुने, मधुकर मस्के, नाना सातपुते, श्रीधर करडे, सुधीर जाधवर, पोपट विधाते, आप्पा फुरडे, राजेंद्र गवळी, महेश जाधव, दिलीप पवार,आनंद डांगे, तात्या कोळी श्री गुंजे तसेच सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक कर्मचारी संघटनेचे इतर प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.




## लायन्स क्लब बार्शी टाऊनच्या अध्यक्षपदी डॉ.योगेश कुलकर्णी

बार्शी : लायन्स क्लब बार्शी टाऊन, लायन्स क्लब बार्शी टाऊन तेजस्विनी व लिओ क्लब ऑफ बार्शी टाऊनच्या नूतन पदाधिकारी यांचा पदग्रहण सोहळा झाला. यासाठी इंडक्शन ऑफिसर म्हणून उपप्रांतपाल एम के पाटील व इंस्टॉलिंग ऑफीसर माजी प्रांतपाल बी एल जोशी होते. तसेच प्रमुख उपस्थिती रिजन चेअरमन ला. राजेंद्र कासवा, झोन चेअरमन ला प्रकाश फुरडे तसेच लिओ डिस्ट्रिक्ट प्रेसिडेंट लिओ शुभम श्रीश्रीमाळ उपस्थित होते. लायन्स क्लब बार्शी टाऊनच्या अध्यक्षपदी ला डॉ योगेश कुलकर्णी, सचिव ला हिम्मत भानुशाली, खजिनदार ला निखिल सरवदे तर तेजस्विनीच्या अध्यक्षपदी ला प्रा अर्चना आवटे, सचिव ला जयश्री ढगे, खजिनदार ला सोनाली कसपटे तर लिओच्या अध्यक्षपदी लिओ अदित्य सोनिग्रा, सचिव लिओ यश कुंकुलोळ, खजिनदार लिओ मित परमार यांचा पदग्रहण झाला. यावेळी तीनही क्लबचे मावळते अध्यक्ष ला अमित कटारिया, ला योगिता कटारिया, लिओ यश मेहता तसेच अतुल सोनिग्रा, वासुदेव ढगे, रवीप्रकाश बजाज, रवी राऊत, महावीर कदम, डॉ हरीश कुलकर्णी, शंभुलाल भानुशाली, संताजी सावंत, आदित्य कोठारी व बार्शीतील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ला. विनोद बुडूख व ला. वैभवी बुडूख यांनी केले तर आभार हिम्मत भानुशाली यांनी मानले.



## संभाजी ब्रिगेड पुणे विभागीय अध्यक्षपदी श्याम कदम यांची निवड

सोलापूर : संभाजी ब्रिगेड महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीची बैठक मुंबई येथे पार पडून या बैठकीत सोलापूर शहर अध्यक्ष श्याम कदम यांची पुणे विभागीय अध्यक्ष पदी निवड करण्यात आली. मुंबई येथील अतिथी सभागृहात संभाजी ब्रिगेडच्या राज्यस्तरीय कार्यकारणीची बैठक पार पडली या बैठकीत निवडीचे नियुक्तीपत्र संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्या हस्ते व संभाजी ब्रिगेडचे महासचिव सुभाष बोरकर प्रदेश कार्याध्यक्ष सुधीरजी भोसले आत्माराम शिंदे सुधाकर मोडक सचिन सावंत देसाई अनिल पाटील रमेश हांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात आले. या निवडीबद्दल मराठा समाजसह सर्व बहुजन चळवळीतील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. या निवडीबद्दल संभाजी ब्रिगेड सोलापूर च्या वतीने सत्कार करण्यात आला.

## अवैद्यरित्या गोवंशीय प्राण्यांची वाहतूक करू नये : पोलीस आयुक्त



सुराज्य/सोलापूर

अवैद्य रित्या गोवंशीय प्राण्यांची वाहतूक करू नये. जनावरांची वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आल्यास नागरिकांनी याची माहिती पोलिसांना द्यावी. कोणत्याही नागरिकाने अथवा संघटनेच्या कार्यकर्त्याने गोवंशीय वाहतुकीचे वाहने स्वत: अवैद्यरित्या अडवू नये, तसेच गोवंशीय प्राण्यांची कुर्बानी देणार नाही याची काळजी सर्वांनी घेण्याचे आवाहन पोलिस आयुक्त राजेंद्र माने यांनी केले.

बुधवारी दुपारी बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्तालयात शांतता कमिटीची बैठक घेण्यात आली. यावेळी पोलिस आयुक्त राजेंद्र माने बोलत होते. यावेळी पोलिस उपायुक्त अजित बोर्हाडे, पोलिस उपायुक्त दीपाली काळे, पोलिस उपायुक्त विजय कबाडे, एसीपी प्रांजली सोनवणे, दीपक आर्वे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

पोलिस आयुक्त माने पुढे म्हणाले, कोणीही कायदा हातात घेऊ नका, जर कोणी कायदा हातात घेतला तर त्याची गय केली जाणार नाही. शिवाय अफवांवर विश्वास ठेवू नका असे आवाहन केले. यावेळी शांतता कमिटीच्या सदस्यांनी विविध सूचना मांडल्या. त्यास संबंधित मनपा अधिकार्यांनी त्यास उत्तरे दिली.

## महापालिकेतर्फे बस सेवा मोफत

# विद्यार्थिनींना आता मिळणार स्मार्ट कार्ड पास

सुराज्य/सोलापूर

शहरातील सर्व शाळांच्या पहिली ते दहावीतील विद्यार्थिनींना शाळेत जाण्यासाठी महापालिका महिला व बालकल्याण समितीच्या वतीने बस सेवा मोफत योजना राबविण्यात येते. या अंतर्गत आता परिवहन विभागाकडून कागदी पास ऐवजी स्मार्ट कार्ड देण्यात येणार आहे. ते स्मार्ट कार्ड कंडक्टर कडून स्वॅप करून या योजनेचा लाभ बस प्रवासात होणार आहे.

सोलापूर महापालिका महिला व समितीच्या वतीने महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त विद्या पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली या समितीचे प्रमुख अधिकारी विठ्ठल कस्तुरे यांच्या माध्यमातून महिला व मुलींसाठी विविध योजना राबविण्यात येतात. त्याचाच एक भाग म्हणून शहरातील विविध शाळांमधील इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थिनींसाठी घराजवळून ते शाळेपर्यंत ये - जा करण्यासाठी मोफत बस प्रवास योजना राबविण्यात येते. यंदाही या योजनेचा लाभ देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही गतीने सुरू आहे.

१५ जूनपासून सर्व शाळा सुरू झाल्या आहेत. शाळा निहाय लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींची यादी करण्यात येत आहे. यादी तयार केल्यानंतर यंदाच्या वर्षीपासून कागदी बस पास ऐवजी आता स्मार्ट कार्ड या लाभार्थी मुलींना देण्यात येणार आहे. ते स्मार्ट कार्ड कंडक्टर कडून स्वॅप करून या योजनेचा लाभ बस प्रवासात होणार आहे. २०२२ २३ या वर्षात महापालिका महिला व बालक कल्याण समितीच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या मोफत बस सेवा योजनेचा लाभ १ हजार ०७३ विद्यार्थिनींनी घेतला. यासाठी महापालिका परिवहन उपक्रमाला महापालिका महापालिका महिला व बालकल्याण समितीकडून ५२ लाख रुपये रक्कम अदा करण्यात आली. सन २०१९-२० व सन २०२१- २१ या वर्षांमध्ये कोरोना काळात ही सेवा बंद होती. तर सन २०१८ -१९ मध्ये २८०० विद्यार्थिनींनी या योजनेचा लाभ घेतला. या पोटी परिवहन उपक्रमास एक कोटी ४० लाख रुपये अदा करण्यात आले तसेच सन २०१७ - १८ मध्ये ३५०० विद्यार्थिनींनी या योजनेचा लाभ घेतला. त्यापोटी महापालिका परिवहन उपक्रमास एक कोटी ४० लाख रुपये रक्कम देण्यात आली.

महापालिका परिवहन उपक्रमाकडील कर्मचाऱ्यांकडून शहरातील शाळानिहाय लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींची यादी प्रत्यक्ष शाळेत जाऊन करण्यात येत आहे. आतापर्यंत शहरातील एकूण ११ शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन इच्छुक विद्यार्थिनींची यादी करण्यात आली आहे. या शाळांमध्ये पाच महापालिका शाळा व सहा इतर शाळांचा समावेश आहे. साधारणतः आतापर्यंत ७५० विद्यार्थिनींची यादीत करण्यात आली आहे. त्यानंतर प्राप्त विद्यार्थिनींच्या आकडेवारीनुसार प्रत्येक शाळेला एक बस उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### स्मार्ट कार्ड पाससाठी ६५ ते १०० रुपये खर्च

या मोफत बस सेवेसाठी लाभार्थी विद्यार्थिनींना कागदी पास ऐवजी स्मार्ट कार्ड पास देण्यात येत आहे. त्यासाठी लाभार्थी विद्यार्थिनींकडून ६५ ते १०० रुपये घेण्यात येत आहे. दरम्यान, या स्मार्ट कार्डसाठी विद्यार्थिनी कडून पैसे घेण्याऐवजी तो खर्चही महिला व बालकल्याण समितीच्या निधीतूनच करण्यात यावा, अशी मागणी पालकांमधून होत आहे.



## मरीआई चौकात पिण्याच्या पाईपलाईनला गळती; हजारो लिटर पाणी वाया

सुराज्य/सोलापूर

सोलापुरातील डोणगाव रोडकडे जाणाऱ्या मरिआई चौकात महापालिकेच्या पिण्याच्या पाईपलाईनला बुधवारी पहाटेपासून गळती सुरू झाल्याने हजारो लिटर पाणी वाया गेले आहे. पाणी गळती इतक्या मोठ्या प्रमाणात होते की पाण्याचा प्रवाह वाहत लक्ष्मी विष्णू चाळीच्या कुठे गेला होता.

बुधवारी पहाटे मरीआई चौकात महापालिकेच्या पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणाऱ्या पाईपलाईनच्या वॉल्वला व पाईपलाईनला मोठ्या प्रमाणात गळती सुरू झाली. नेमकं पाणी येण्याच्या दिवशीच या पाईपलाईनला गळती सुरू झाल्याने आजूबाजूच्या परिसराला पाणीपुरवठा होण्याची शक्यता कमी आहे.

बुधवारी पहाटे सुरू झालेली ही गळती सुमारे ११ वाजेपर्यंत तशीच चालू होती. आधीच सोलापूर शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न अतिबिकट व विस्कळीत झाला आहे ; त्यातच बुधवारी पाईपलाईन ला लागलेल्या गळतीमुळे परिसराला पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या पाण्यापैकी हजारो लिटर पाणी वाया गेले आहे.

महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने शहरात विविध ठिकाणी होणाऱ्या अशा गळतींकडे लक्ष देऊन पाण्याचा होणारा अपव्यय व नासाडी थांबवण्याची मागणी शहरवासीयांकडून व स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

## कच्च्या रस्त्यावरून दुचाकी उलटल्याने ४५ वर्षीय इसम ठार

सुराज्य/सोलापूर

दुचाकी वरून जात असताना रस्ता दुरुस्तीच्या दगडाच्या अजो ऱ्यावरून खाली पडल्याने शिवपुत्र वीरप्पा देवंतगी (वय ४५ रा. कौलगी ता.आळंद जि. कलबुर्गी) हे शेतकरी गंभीर जखमी होऊन मरण पावले. हा अपघात चपळगाव ते अक्कलकोट मार्गावरील दहिटणे साखर कारखान्याजवळ मंगळवारी सायंकाळच्या सुमारास घडला. शिवपुत्र देवंतगी हे काल सायंकाळी दुचाकीवरून चपळगाव ते अक्कलकोटच्या दिशेने निघाले होते. दहिटणे साखर कारखान्या जवळील कच्च्या रस्त्यावरून जात असताना हा अपघात घडला .त्यांना अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून संतोष बंदीछोडे (मेहुणा) यांनी अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारापूर्वी मयत झाले . या अपघाताची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## वैराग येथे पिकप चालकास अडवून काठीने मारहाण

मोहोळ येथून वैराग येथे पिकप मालवाहतूक घेऊन जात असताना वाटेत वाहन अडवून काठी आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणी अकबर शहाजान शेख (वय ४५ रा.मेहबूबनगर मोहोळ) हे ड्रायव्हर जखमी झाले. ही घटना बुधवारी सकाळच्या सुमारास वैराग येथे घडली. त्यांना उपचारासाठी सोलापूरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.अनोळखी लोकांनी त्यांना मारहाण केली, अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.



## विद्यार्थ्यांनी स्मार्टवर्क करणे शिकावे : प्रा. मोहन पटेल

सुराज्य/सोलापूर

स्मार्ट वर्क म्हणजे कमी वेळेत व कमी कष्टात केलेले काम जसे आई आपल्या सर्व मुलांच्या बाबतीत करते, शिक्षक आपल्या अनेक विद्यार्थ्यांच्या बाबतीत करतात तसेच वर्क टेक्नॉलॉजी च्या बाबतीत केले की तो स्मार्ट प्रोजेक्ट, स्मार्ट सिटी असा ओळखला जातो. स्मार्ट वर्क करायचे असेल तर नेहमी आपले शिक्षक व पालक यांचे अनुकरण करा, असे मार्गदर्शन मोहन पटेल यांनी केले.

ए.जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मोहन पटेल पी पी सावनी हे सेंटर फॉर युनिव्हर्सिटीचे प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. तसेच सोलापूर स्मार्ट सिटी प्रोजेक्ट चे सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांना स्मार्ट सिटी तसेच त्यांच्या क्षेत्रातील अनुभव कथन केले. निमित्त होते वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे.

याप्रसंगी संस्थेचे सचिव एस.ए. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार तंत्रनिकेतनचे उपप्रचार्य एस. के. मोहिते इत्यादी व्यासपीठावर उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष ए.जी. पाटील व सचिव एस.ए. पाटील यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. हा कार्यक्रम यशस्वी व्हावा म्हणून समन्वय प्रा.श्रीशैल बिराजदार, प्रा. सविता कोनापुरे व प्रा.सुधन्वा देशपांडे इत्यादींनी विशेष परिश्रम घेतले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रजनीगंधा मैत्री यांनी केले तर आभार प्रा. श्रीशैल बिराजदार यांनी मांडले.

# बॉण्ड पेपरवर हमीपत्र दिल्यानंतरच मिळणार पार्क स्टेडियम

### ऑनलाइन बुकींगची सोय उपलब्ध
### ७ हजारपासून १३ हजारांपर्यंत असणार दर

सुराज्य/सोलापूर

शहरातील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या इंदिरा गांधी स्टेडियम (पार्क) चे मैदान क्रिकेट स्पर्धे साठी देण्यात येत आहे. या मैदानावर सामने अथवा स्पर्धा घ्यावयाची असल्यास आता संयोजकास ऑनलाइन बुकींगची सोय महापालिकेने उपलब्ध करून दिली आहे.

दुसरीकडे बॉण्ड पेपरवर हमी पत्र लिहून दिल्यावरच मैदान खेळासाठी मिळणार असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे. सोलापूर महानगरपालिका व स्मार्ट सिटीच्या माध्यमातून पार्क येथे पहिल्या टप्प्यात मैदानावरील ११ मुख्य तसेच ६ सराव खेळपट्टया तयार करण्यात आल्या आहेत.

या मैदानावर पॅव्हेलियन इमारत, पंचकक्ष, व्ही.आय. पी कक्ष आणि माध्यम कक्ष ही तयार करण्यात आले आहे. त्याचबरोबर आयपीएल, रणजी सामने भरवण्याची सोय झाली आहे. पार्क मैदान हे क्रिकेट स्पधसाठी मैदान उपलब्ध करून देण्यात आले असून त्यासाठी आता ऑनलाइन बुकिंग करता येणार आहे. क्रिकेट मैदान बुकिंग करण्याकरिता लेदर बॉल शनिवारी व रविवारी असल्यास प्रति दिवस १३ हजार रूपये अधिक जीएसटी, तसेच लेदर बॉल सोमवार ते शुक्रवार प्रति दिवस ९ हजार अधिक जीएसटी भरावे लागणार आहे. पाच दिवस अथवा त्यापेक्षा जास्त दिवस क्रिकेट मैदान बुकिंग केल्यास लेदर बॉल साठी सोमवार ते रविवार ७ हजार अधिक जीएसटी भरावे लागणार आहे.




### ऑनलाइन बुकींग असे करा

टूर्नामेंट स्पर्धेसाठी मैदान बुक करावयाच्या झाल्यास कमीत कमी ५ दिवस बुकिंग करावा लागेल. ऑनलाईन बुकिंग सामन्याचे तारखेच्या एक वर्ष आधीपासून करता येईल. अर्जदाराने मैदान बुकिंग हे महापालिकेच्या वेबसाईटवर ऑनलाइन पद्धतीने करणे आवश्यक आहे. मैदान बुकिंग करतेवेळी विहित नमुन्यातील हमीपत्र ऑनलाइन अपलोड करणे आवश्यक आहे. त्यासाठीचे आवश्यक ते कागदपत्रे आपल्याला ऑनलाईन भरावे लागणार आहे. बुकिंगचे भाडे ऑनलाईन पद्धतीनेच भरावे लागणार आहे.

## कुत्रा आडवा आल्याने अपघात

सोलापूर : कुत्रा आडवा आल्याने दुचाकीवरून घसरून जखमी झालेले यल्लाप्पा सिद्राम कोळी (वय २६ रा. गुरुदत्त नगर, जुळे सोलापूर) हे सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना बुधवारी सकाळी मयत झाले.

ते पाच ते सहा दिवसांपूर्वी घरासमोरून दुचाकीवरून जात होते. त्यावेळी अचानक कुत्रा आडवा आल्याने ते जमीनीवर कोसळून जखमी झाले होते. त्यांना खाजगी रुग्णालयात उपचार करून १९ जून रोजी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान ते आज सकाळी मयत झाले, अशी नोंद विजापूर नाका पोलिसात झाली आहे.

**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ औरंगाबाद**
**पानचक्की, औरंगाबाद ४३१००२**
Tele-fax: 0240-2401584/2402366
Website : www.mahawakf.com Email: enqmsbw@gmail.com

संचिका क्र. ६९-२१६-२०१८
क्र. मरावंम/चौकशी/योजना/४७९७/२०२०
दिनांक : १८ डिसेंबर २०२०

**नमूना अ यू**
(नियम ३१ पहा)
**(जाहीर नोटीस)**

**प्रकरण :** वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करण्याच्या अनुषंगाने नोटीस

वक्फ संस्था Jame Masjid Trust va Kabrastan, At Kawathe, Tq. N. Solapur, Solapur.

ज्याअर्थी, वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३२ अन्वये राज्य वक्फ मंडळाला राज्यातील वक्फ संस्थेचे प्रशासन करण्याकरिता वक्फ संस्थेची योजना वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये मंजूर करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी, वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये Jame Masjid Trust va Kabrastan, At Kawathe, Tq. N. Solapur, Solapur. ही संस्था नोंदणीकृत असून या संस्थेचा नोंदणी क्रं. MSBW/SLR/335/2017 असा आहे, आणि

ज्याअर्थी Mr. Sardar Usman Shaikh & Ors, R/o At Kawathe, Tq. N. Solapur, Solapur यांनी दिनांक. ०८.०६.२०१८ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या हितासाठी व या वक्फ संस्थेच्या सूयोग्य व्यवस्थापनाकरीता वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे योजना सादर केली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र राज्य वक्फ नियम २००३ मधील नियम क्रं. ३१ अन्वये सदर वक्फ संस्थेच्या व्यवस्थापनासाठी योजना मंजूर करण्याचा प्रस्ताव विचारात घेताना या वक्फ संस्थेच्या योजनेविषयी गैरअर्जदार यांच्या काही तक्रारी, आक्षेप असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांच्याकडे आपले म्हणणे दाखल करावे, असे सुचित करण्यात येत आहे.

**सही/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद**

### सोलापूर-उजनी समांतर जलवाहिनी

# जॅकवेलचे काम ब्रेकरने होईना; पोचमपाडने मागितली ब्लास्टींग उडवण्याची परवानगी

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर महानगरपालिकेच्या स्मार्ट सिटी योजनेमधून समांतर जलवाहिनीच्या कामाला सुरुवात झाली आहे. हैदराबाद येथील पोचमपाड या कंपनीला वर्क ऑर्डर दिल्यानंतर कंपनीने तातडीने कामाला सुरुवात केली आहे. कंपनीने जॅकवेलचे काम लवकरात लवकर करण्यासाठी सेंट्रल वॉटर कमिशन आणि महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागाकडे ब्लास्टिंग उडवण्याची परवानगी मागितली आहे.

समांतर जलवाहिनीचे काम या महिन्यात सुरू करण्यात आले आहे. पावसाळ्यात जॅकवेलचे काम करता येणार नाही म्हणून तातडीने उजनी धरणात जॅकवेलच्या कामाला प्रारंभ करण्यात आला. हे काम लवकरात लवकर उरकण्यासाठी पोचमपाड कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी सर्व नियम अटी बासनात गुंडाळून चक्क उजनी धरण क्षेत्रात ब्लास्टिंग उडवले होते. यावरून बराच गदारोळ झाला होता. नियमानुसार उजनीच्या धरण क्षेत्रात ब्लास्टिंग उडवता येत नाही. कारण जर ब्लास्टिंग उडवले तर सोलापूरची सर्वात मोठ्या ११७ टीएमसी क्षमतेच्या उजनी धरणाच्या बंधाऱ्याच धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ब्लास्टींग केल्याची ही बाब पाटबंधारे विभागाला समजतात अधिकाऱ्यांनी तातडीने उजनी धरणाला भेट देऊन पोचमपाड कंपनीचे काम थांबून जॅकवेलचे काम ब्रेकरने करण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानंतर पोचमपाड कंपनीने जॅकवेलच्या कामाला ब्रेकरने सुरुवात केली. मात्र या कामाला खूपच वेळ होत आहे. याशिवाय ब्रेकर न काम करणे शक्य नाही. त्यामुळे उजनी धरणात जॅकवेल कामासाठी लास्टिंग उडवल्याशिवाय पर्याय नाही, असे कंपनीचे म्हणणे आहे. त्यासाठी आता कंपनीने सोलापूर महापालिकेच्या स्मार्ट सिटी कडून सेंट्रल वॉटर कमिशन आणि महाराष्ट्र शासन जलसंपदा विभागाकडे ब्लास्टिंग उडवण्याची परवानगी मागितली आहे. तसा प्रस्ताव पाठवला आहे. दरम्यान, सेंट्रल वॉटर कमिशनच्या पथकाने उजनी धरण क्षेत्रात सुरू असलेल्या कामाची पहाणीही केली आहे. उजनी धरण्याच्या बंधाऱ्यापासून जॅकवेलचे अंतर ३०० मीटर असेल तर ब्लास्टिंग उडवता येत नाही असे प्रशासनाचे म्हणणे आहे. मात्र सध्या जॅकवेलचे अंतर ६०० मीटरहून अधिक आहे.

# रोहिणी-मृग नक्षत्र पाठ फिरवल्याने शेतकरी हवालदिल

## बी-बियाणे, रासायनिक खतांची विक्री थांबली; दरात घट

✔ सुराज्य/दक्षिण सोलापूर



खरीप हंगामात रासायनिक खते विक्रीसाठी गजबजणाऱ्या मंद्रूप,टाकळी,कुंभारी, वळसंग, हत्तुर, भंडारकवठे, कंदलगावसह तालुक्यातील सर्वच कृषी केंद्रावर शेतकऱ्यांची गर्दी कमी झाल्याने अनेक कृषी सेवा केंद्रावर शुकशुकाट पसरलेल्याचे चित्र दिसत असून पावसाअभावी बी-बियाणे व खतांची विक्री थांबली आहे. त्यामुळे पावसाची प्रतीक्षा कृषी केंद्रासह शेतकऱ्यांना लागली आहे.

रोहिणी नक्षत्र वाया गेल्याने मृग नक्षत्राच्या पावसला वीस दिवस होऊनही पावसाचा पत्ता नाही. त्यामुळे खरीप पेरण्यासाठी सज्ज असणाऱ्या शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. दुसरीकडे तालुक्यात विविध ठिकाणाच्या कृषी केंद्रावरील कृषी मालाच्या खरेदीसाठी शेतकऱ्यांची असणारी गर्दी ही पाऊस नसल्याने कमी झाली आहे.

खरीप हंगाम पेरणी पूर्वतयारी म्हणून अनेक शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील रानाची मशागत पूर्ण केली असून पेरणीसाठी रान तयार करूनही रोहिणी व मृग नक्षत्राने दांडी मारल्याने अनेक शेतकरी हवालदिल झाले आहेत. तालुक्यातील जवळपास ३० ते३५ टक्के शेतकऱ्यांनी बी-बियाणे व खतांच्या मालाची खरेदी केली तर यासाठी पाच-सहा दिवसापूर्वी खरेदीसाठी सर्वच कृषी सेवा केंद्रावर गर्दी होती.

परंतु पावसाने मारलेल्या दडीमुळे मात्र गेल्या पाच-सहा दिवसांपासून कृषी सेवा केंद्रावर कृषी मालाच्या खरेदीसाठी शेतकऱ्यांची गर्दी एकदमच कमी झाली आहे. तर काही कृषी सेवा केंद्रावर गर्दी नसल्याने शुकशुकाट पसरल्याचे पहावयास मिळत आहे. यावर्षी कृषी सेवा केंद्रावर सर्वच विविध कंपनीच्या सोयाबीन, उडीद, भुईमूग, मूग ,बाजरीसह इतर बियाणे तसेच रासायनिक खताच्या मुबलक प्रमाणात साठा उपलब्ध आहे. त्यात सोयाबीन, उडीदाच्या नवीन बियाण्यांच्या वानाला मोठी मागणी सर्वत्र दिसत आहे. बियाणे व खते खरेदीचा कल शेतकऱ्यांचा असताना पावसामुळे शेतकऱ्यांची खरेदीची धावपळ ही सध्या कमी झाली आहे.

पावसाने मारलेल्या दडीमुळे खरिपाची पेरणी लांबली आहे. त्याचा परिणाम कृषी सेवा केंद्रावर झाला आहे. दरवर्षीच्या तुलनेने, ३० ते३५ टक्के माल शेतकऱ्यांनी खरेदी केला असला तरी उर्वरित ७० ते ६५ टक्के शेतकऱ्यांनी अजूनही कृषी मालाची खरेदी केली नाही. तर अशा शेतकऱ्यांना पावसाची प्रतीक्षा असल्याने कृषी सेवा केंद्रावर गर्दी एकदम कमी झाल्याचे पहावयास मिळत आहे. त्यामुळे कृषी सेवा केंद्र संचालकांनाही पावसाबरोबरच आता ग्राहकांची प्रतीक्षा करावी लागत आहे. ,२३ जून पासून मृग नक्षत्राला सुरुवात होईल अशी हवामान खात्याच्या अंदाज वर्तवण्यात आला आहे. तरी मात्र या नक्षत्रात अद्याप पर्यंत ही पाऊस झाला नाही त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.



## सोलापूर विद्यापीठाच्या खेळाडूची जागतिक स्पर्धेसाठी निवड

✔ **सोलापूर** : भुवनेश्वर (ओरिसा) येथे दि.१५ जून २०२३ रोजी संपन्न झालेल्या भारतीय विश्वविद्यालय संघ (खण) आयोजित जागतिक विद्यापीठ निवड चाचणी स्पर्धेत हाफ मॅरेथॉन (रोड रेस) या प्रकारामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या अरुण धनसिंग राठोड या विद्यार्थी खेळाडूने प्रथम क्रमांक मिळविला आहे. त्याने १ तास ०६ मिनिटे ४४ सेकंद इतकी वेळ पूर्ण करून जागतिक स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले आहे. सोलापूर विद्यापीठाच्या क्रीडा व शारिरीक विभागाची ही आतापर्यंतची सर्वोच्च कामगिरी आहे.जागतिक स्पर्धेत पात्र होण्यासाठी २१ किलोमीटरचे अंतर पूर्ण करण्याची १ तास १० मिनीटाची वेळ होती. भुवनेश्वर येथे झालेल्या निवड चाचणीत अरूण राठोड याने २१ किलोमीटरचे अंतर १ तास ६ मिनीटे व ४४ सेकंदात पूर्ण करून प्रथम क्रमांक पटकावत जागतिक स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.आता चीनमध्ये २८ जुलै ते ०८ ऑगस्ट २०२३ दरम्यान होणाऱ्या जागतिक स्पर्धेत हा खेळाडू सहभागी होणार आहे. अरूण राठोड यांच्यासोबत भुवनेश्वर येथे चाचणीसाठी संघव्यवस्थापक म्हणून डॉ. किरण चोकाककर तर प्रशिक्षक म्हणून डॉ. अशोक पाटील होते.याप्रसंगी कुलसचिव योगिनी घारे, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. देवानंद चिलवंत, सचिन गायकवाड, विद्यापीठाचे क्रीडा व शारिरीक शिक्षण विभागाचे प्रभारी संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, माजी संचालक डॉ. सुरेश पवार उपस्थित होते.

## वेळापूर येथे दोन दुचाकींची समोरासमोर धडक ; एक ठार दुसरा जखमी

✔ **सोलापूर** : वेगाने जाणाऱ्या दोन मोटारींची समोरासमोर धडक झाल्याने एका दुचाकी वरील ५२ वर्षीय इसम ठार, तर दुसऱ्या दुचाकी वरील तरुण गंभीर जखमी झाला. हा अपघात पंढरपूर ते पुणे रोडवरील वेळापूर येथे सोमवारी सायंकाळच्या सुमारास घडला.

नामदेव कुंडलिक पिसे (वय ५१ रा. पिसेवाडी ता.माळशिरस) असे मयत झालेल्या दुचाकी चालकाचे नाव आहे .ते सायंकाळी सात वाजेच्या सुमारास वेळापूर येथील इको बोर्ड कंपनीकडून निघाले होते. त्यावेळी समोरून दुसरी दुचाकी धडकल्याने पिसे आणि अक्षय प्रकाश सोनवणे (वय २३ रा.लातूर ) असे दोघे जखमी झाले त्यापैकी नामदेव पिसे हे उपचारापूर्वी मयत झाले . या अपघाताची नोंद वेळापूर पोलिसात झाली पुढील तपास हवालदार तांबोळी करीत आहेत.

# लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालयामध्ये काव्यसंम्मेलन

✔ सुराज्य/उ. सोलापूर



लोकमंगल विज्ञान व उद्योजकता महाविद्यालयाच्या वतीने दि. १९ जून २३ रोजी आषाढ महिन्याच्या प्रथम दिवशी कवि कुलगुरु कालिदास यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधुन काव्यसंम्मेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या काव्यसंम्मेलनासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन माऊली. पत्रकार, किर्तनकार, उत्कृष्ट निवेदक दत्तात्रय मोकाशी हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाच्या पदव्युत्तर विभागाचे प्रमुख डॉ. किरण जगताप हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. गौतम जाधव यांनी केले. हा काव्यसंम्मेलनाचा कार्यक्रम प्रतिवर्षी आषाढ महिन्याच्या पहिल्या दिवशी लोकमंगल समुहातील प्रत्येक युनिटमध्ये एकाच दिवशी एकाच वेळी जवळपास १५०० ठिकाणी साजरा होत असल्याचे नमुद केले.

या काव्य संम्मेलनासाठी जैवतंत्रज्ञान विभागाचे प्रमुख प्रा. अंकुश गोरट्याल, डॉ. सुप्रतिक पालचौधरी, डॉ. अंकुर अधिकारी, प्रा. समाधान कदम, प्रा. भारती जाधव, प्रा. स्नेहल मठे, प्रा. मोनिका गुंड, अर्चना गाडेकर आदि शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. शीतल भोजने यांनी, आभार उद्योजकता विभागाच्या प्रमुख प्रा. श्रीदेवी खांडेकर यांनी केले.

# अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त ४९ हजार; शेतकऱ्यांना मिळणार ४७ कोटींचा निधी

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्हात सन २०२२ मध्ये मोठ्या प्रमाणात झालेल्या अतिवृष्टीच्या निकषात न बसलेल्या शेतकऱ्यांनादेखील आता मदत निधी मिळणार आहे. १३ जून रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार सोलापूर जिल्हासाठी ४६ कोटी ८९ लाख ८५ हजाराचा निधी मंजुर केला आहे. यांचा लाभ सोलापूर जिल्हातील ४९ हजार १६८ शेतकऱ्यांना होणार आहे.

१३ जून २०२३ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार गेल्या वर्षी सन २०२२ मधील पावसाळी हंगामात अतिवृष्टीच्या निकषाबाहेरील पावसामुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीकरिता सुमारे १५ लाख ५७ हजार ९७१ हेक्टर बाधित क्षेत्रातील २६ लाख ५० हजार ९५१ शेतकऱ्यांना १५०० कोटी रुपयांची मदत देण्याचा निर्णय झाला आहे.

सोलापूर जिल्हातील बार्शी, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर या तालुक्यात अतिवृष्टीचा मोठा फटका बसला होता. शासन निर्णयानुसार सलग ६५ मिलीमिटर पावसामुळे झालेल्या पिकांचे पंचनामे प्रशासनाच्या वतीने केले गेले. मदतीसाठी पात्र ठरले. मात्र यावर लोकप्रतिनिधी आणि शेतकऱ्यांनी अक्षेप घेत सलग मदत देण्याची मागणी केली होती. त्यानुसार पुन्हा फेर पंचनामे करून राज्यशासनास अवाहल सादर केला होता. त्यानुसार राज्यातील सर्व शेतकऱ्यांना निकषाबाहेर जाऊन मदत जाहीर केली आहे. सोलापूर जिल्हासाठी ४६ कोटी ८९ लाख ८५ हजार निधी मिळणार आहे. यांचा फायदा ४९ हजार १६८ शेतकऱ्यांना होणार आहे. तब्बल ४० हजार ६७४ हेक्टर क्षेत्रावरील पिके बाधित झाली होती.

# वाळू उपसा करण्यासाठी पाच घाटांचा ठेका फिक्स

✔ सुराज्य/सोलापूर



नव्या वाळू धोरणानुसार नागरिकांना सहाशे रुपये ब्रासने वाळू मिळण्याचा मार्ग मोकळा आहे. वाळू उपसा करून देण्यासाठी काढण्यात आलेली निवेदा प्रक्रिया पूर्ण करत. पाच घाटाचा ठेका फिक्स केला आहे. के.एस. कन्ट्रक्शनला हा मक्त देण्यात आला आहे. मात्र पंढरपूर तालूक्यातील गुरसाळे येथिल वाळूघाटास प्रतिसाद मिळाला नाही त्यामुळे सोमवार पर्यंत निविदेस मुदतवाढ देण्यात आली आहे. अशी माहिती माहिती उपजिल्हाधिकारी विठ्ठल उदमले यांनी दिली.

जिल्ह्यातील पंढरपूर, मंगळवेढा व माळशिरस तालुक्यातील चळे, उचेठाण, जांभुड, उंबरे, वाफेगाव व गुरसाळे याठिकाणी वाळू घाट निश्चत करण्यात आले आहेत. १९ जून निविदा काढण्यात आली होती. सहा ठिकाणच्या वाळुघाटांना २७ जणांकडून बोली लावण्यात आली होती. गुरसाळे वगळता पाच ठिकाणच्या निविदाधारकांची तांत्रिक तपासणी केल्यानंतर काशिनाथ वाले यांच्या के.एस. कन्ट्रकशनला पाच ठिकाणचा वाळू उपसा करण्याचा मक्ता देण्यात आला आहे. मक्तेदारांने वाळू उपसा करून प्रशासनाच्या डेपोला वाळू पुरवठा करायचा आहे. प्रशासनाकडून मागणीनुसार एका व्यक्तीला एका महिन्यात जास्तीत जास्त बारा ब्रास वाळू देता येणार आहे.

# आरोग्य वारी आज जिल्ह्यात



✔ **सोलापूर** : आषाढी वारीत सहभागी होणायी लाखो महिला वारकऱ्यांना सुरक्षा आणि आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य महिला आयोगाकडून आयोजित 'आरोग्य वारी सोलापूर जिल्हयात दाखल होत आहे. गुरूवार, दि. २२ जून रोजी दुपारी ३.३० वाजता राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या हस्ते नातेपुते येथील महिला सुविधा केंद्राचे उद्‌घाटन करण्यात येणार आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, स्थानिक लोकप्रतिनीधी यांच्या उपस्थितीत नगर पंचायत सभागृह, महादेव मंदिर रोड, मैनपेठ, नातेपुते येथे आरोग्य वारीच्या अंमलबजावणीसाठी आढावा घेण्यात येणार आहे.

महिला वारकर्यांना वारीत चालत असताना आरोग्य सुविधा, सुरक्षितता उपलब्ध करुन देण्यासाठी राज्य महिला आयोगाकडून आरोग्य वारी उपक्रम हाती घेण्यात आला आहे. आरोग्य वारीचे हे दुसरे वर्ष आहे.

## निधन वृत्त

### भिमशा अर्धाले



✔ **अक्कलकोट** : अक्कलकोट तालुक्यातील हंजगी येथील कै भिमशा बमण्णा अर्धाले (वय वर्षे ९७) यांचे आज सकाळी ९.०० वाजता दुखःद निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा चार मुली, एक सुन व नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा उद्या दि २२ जून रोजी सकाळी १०.०० वाजता हंजगी येथील राहत्या घरातून निघणार आहे. कै.भिमशा अर्धाले हे हंजगी येथील ग्रामदैवत माता कट्टेव्वा देवींचे पुजारी म्हणून ते परिचित होते. आरोग्य सेवक बंमलिंग अर्धाले यांचे ते वडील होत.

### सूर्यकांत उपासे



✔ **अक्कलकोट** : चपळगाव ता.अक्कलकोट येथील सूर्यकांत कल्लप्पा उपासे (वय ७२ वर्षे) यांचे आज सकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने सोलापूर येथे निधन झाले. त्यांच्यावर उद्या बुधवारी सकाळी नऊ वाजता चपळगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन मुली सुना व नातवंडे असा परिवार आहे.

### सुरेखा पाटील



✔ **सोलापूर** : भागाईवाडी येथील ग्रामपंचायतीचे माजी सदस्य प्रताप पाटील यांच्यापत्नी सुरेखा पाटील यांचे दिर्घ आजाराने मंगळवारी निधन झाले यांच्या पश्चात दोन मुले, सुना, एक मुलगी, नातु असा मोठा परिवारआहे. माजी मंडल अधिकारी पांडूरंग पाटील यांच्या भावजय तर पोलीस पाटील सजित पाटील यांच्या काकी होत्या.

# शहरात विविध ठिकाणी योग दिवस उत्साहात

### पु. अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

✔ **सोलापूर** : निरोगी मन व शरीरासाठी योग आवश्यक असून नियमित योगा करणे महत्त्वाचे आहे. सदृढ आरोग्यासाठी योग हा जीवनाचा एक अविभाज्य घटक बनला पाहिजे, असे मत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. गौतम कांबळे यांनी व्यक्त केले.

बुधवारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या दीक्षांत प्रांगणात जागतिक योग दिनानिमित्त योग प्रात्यक्षिकेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. गौतम कांबळे यांच्या हस्ते वृक्ष रोपाला पाणी घालून योग प्रात्यक्षिक कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी कुलसचिव योगिनी घारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. शिवकुमार गणपूर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, इनक्युबेशन सेंटरचे संचालक डॉ. सचिन लड्डा आदी उपस्थित होते.

**भारतीय जनता पार्टी शहर उत्तर**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भारतीय जनता पार्टी शहर उत्तर च्या वतीने आमदार विजयकुमार देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आनंद गोसकी यांच्या नेतृत्वाखाली साखर पेठेतील विणकर बाग येथे पतंजलि योग पीठ समिती, जनआधार फाऊंडेशन, हरीओम विणकर बाग बहुद्देशिय संस्था, हरीओम विणकर बाग प्रभात मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी, २१ जून रोजी सकाळी आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा करण्यात आला. यावेळी भाजपा उपाध्यक्ष प्रशांत फत्तेपुरकर,भाजपा ज्येष्ठ नेते तुळशीदास भुतडा, सुधाकर नराल, अमर पुदाले, लक्ष्मिकांत दंडी, सत्यनारायण पसनूर, किरण आंबट, दीनानाथ दुळम, गणेश गुज्जा, हिरालाल दुळम, राजु येमुल, अशोक येज्जा, योग प्रशिक्षक नागेश्वर कन्ना (सर), प्रा. संदीप क्षिरसागर यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महेश दासी, दिनेश सुरा, शुभम मिठ्ठा, शंकर म्हंता, दत्तात्रय चिंता, महेश कासार, दत्तात्रय चिंता, दिलीप मुमुडले, बसवराज गडगी, शंकर म्हंता आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मध्य रेल्वे, सोलापूर**

मध्य रेल्वे च्या सोलापूर विभागात जागतिक योग दिवस पर पडला. जागतिक योग दिवसाचे औचित्य साधुन बुधवार दिं. २१ रोजी डॉ. बाबासाहेब आबेडकर रेल्वे क्रिडा संकुल, सोलापुर येथे योग शिबिराचे



आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात सोलापूर मंडल मधिल रेल्वे अधिकारी, कर्मचारी आणि त्यांच्या परिवारातील सदस्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला होता.

या शिबिराचे उद्घाटन सोलापूर रेल्वे विभागाचे विभागीय व्यवस्थापक नीरज कुमार दोहरे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी सोलापूर रेल्वे विभागाचे विभागीय व्यवस्थापक नीरज कुमार दोहरे, वरिष्ठ मंडल कार्मिक अधिकारी जी. पी. भगत, वरिष्ठ मंडल अभियंता (समन्वय) चंद्रभूषण, वरिष्ठ मंडल वित्त प्रबंधक विवेक होके, वरिष्ठ मंडल सिग्नल एंव दुरसंचार इंजिनियर राहुल ग़ौड, वरिष्ठ मंडल सुरक्षा अधिकारी शिवाजी कदम, मंडल कार्मिक अधिकारी मच्छिंद्र गळवे, सहाय्यक सुरक्षा आयुक्त कबीर कुमार दास आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडल कार्मिक अधिकारी मच्छिंद्र गळवे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य कल्याण निरीक्षक सचिन बनसोडे, महावीर निमाणी, अक्षय गर्दने, अरविंद खडाखडे, पंकज कुमार, श्रीमती शिल्पा ढेपले, कार्यालय अधिक्षक अजय लोंढे व त्यांच्या सहका-यांनी विषेश परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागेंन्द्र मानेकरी यांनी केले.

**श्री मल्लिकार्जुन हायस्कूल**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालय हत्तुरे नगर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला.

या योगदिनी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी ४० व ९५२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालय हत्तुरे नगर सोलापूर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे, धरेप्पा हत्तुरे,पर्यवेक्षक गिरमल्ला बिराजदार यांच्या उपस्थित हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी क्रीडा शिक्षक गंगाराम घोडके व परमेश्वर चांदोडे यांनी योगासनाचे प्रकार, सूर्यनमस्कार व प्रकाश प्रवहन याबद्दल माहिती सांगितली. या कार्यक्रमास मारुती माने, बसवराज कोरे,अण्णाराया तुप्पद,सविता कुलकर्णी, प्रशालेतील व महाविद्यालयातील विद्यार्थी,शिक्षक, प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**एस,व्ही,सी,एस,एम,आय,डी, सी, प्रशाला**

निरोगी शरीर, मन,व बुध्दि यांच्या विकासासाठी योगा हाच उपाय-संगप्पा म्हमाणे सोलापूर-निरोगी शरीर,मन,व बुध्दी यांच्या विकासासाठी योगा हाच रामबाण उपाय असल्याचे प्रतीपादन एस,व्ही,सी,एस,एम,आय,डी, सी, प्रशालेचे मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे यांनी केले. आंतरराष्ट्रीय जागतिक योग दिनानिमित्त प्रशालेत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.विवेकानंद केंद्राचे रवी कंटली, अंबादास नका,रोहित कंटली,वृन्दा गाजुल व रुद्रेश्वर गाजुल यांनी योगाचे प्रात्यक्षिक सादर करून योगविषयीची माहिती विध्यार्थ्यांना दिली.

या योगासनात प्रशालेतील इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंतच्या सुमारे दोन हजार तीनशे एक विध्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांबरोबर उपमुख्याध्याक गिरीमल बुगडे ,पर्यवेक्षक विलास म्हमाणे व प्रशालेतील शिक्षक- शिक्षिका यांनी ट्रॅक सूट परिधान करून योगामध्ये सहभाग नोंदविला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनंजय नकाते यांनी केले.

**विमा रुग्णालय**

सोलापूर- होडगी रोडवरील राज्य कामगार विमा रुग्णालयात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन बुधवारी सकाळी करण्यात आले होते. या कार्यक्रमास वैद्यकीय अधीक्षक डॉ . कुलकर्णी, आहरण व संवितरण अधिकारी डॉ.वाळूजकर, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.बानेगाव,प्रशासकीय अधिकारी,नोडल ऑफीसर डॉ.नंदीमठ,योग प्रशिक्षक जितेंद्र महामुनी ,सामाजिक मार्गदर्शक प्रफुल बनसोडे आणि विमाधारक उपस्थित होते जागतिक योग दिनानिमित्त मार्गदर्शन करताना योग प्रशिक्षक महामुनी यांनी राकाविमो रुग्णालय सोलापूर येथे सुरू करण्यात आलेल्या योग विभागाची माहिती दिली . तसेच योगाचे दैनंदिन जीवनातील महत्व काय आहे याविषयी मार्गदर्शन केले.



## पिलीव येथील शिवतेज लोखंडेची राज्य तायक्कांदो कराटे स्पर्धेसाठी निवड

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील माजी सरपंच अप्पासाहेब लोखंडे यांचा मुलगा शिवतेज हा आठवीमध्ये शिकत आहे. सोलापूर तायक्कांदो स्पोर्ट कौन्सिल यांच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेत शिवतेज याने प्रथम क्रमांक मिळवुन आपले नाव गुणवत्ता यादीत झळकाविले.शिवतेज लोखंडे यास सोलापूर जिल्हा तायक्कांदो स्पोर्ट कौन्सिलचे अध्यक्ष मोहन भुमकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र व पदक देऊन सन्मानीत करण्यात आले.यावेळी सचिव मंजुर शेख,सोमेश्वर घोंगडे व इतर मान्यवर उपस्थितीत होते.

शिवतेज याची पुढे मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धे साठी निवड झाली आहे. शिवतेजच्या हया यशाबददल सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी कृषी व पशुसंवर्धन सभापती संग्रामसिंह जहागिरदार, पिलीवचे सरपंच नितीन मोहिते, माजी जि प सदस्य गणेशदादा पाटील, मार्गदर्शक शिक्षक वाजिद शेख यांच्या सह विविध क्षेत्रातील मान्यवर यांचयाकडुन शिवतेजचे हया यशाबददल अभिनंदन व कौतुक होत आहे.



## पाथरी ते तेलगाव रस्त्यावरील अतिक्रमण काढा : साठे

**उ. सोलापूर** : पाथरी तेलगाव या रस्त्याच्या दोन्ही बाजूला स्थानिक शेतकऱ्याने अतिक्रमन केलं असून स्थानिक रहिवासी, प्रवासी,विद्यार्थी, शेतकरी यांना अरुंद रस्त्याचा त्रास होत असून अतिक्रमण काढून खुला करण्यात यावा अशी मागणी जिल्हा अधिकारी यांना बळीराम काका साठे ह्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.यावेळी प्रकाश गुरव,विष्णू बंडगर यांची प्रमुख उपस्थिती होती. चार ते पाच वर्षांपासून रस्त्याचा वाद मिटत नसल्याने,उतरच्या प्रशासनाला वारंवार पत्रव्यवहार करूनही दखल घेतली जात नाही. आपण स्वतः पुढाकार घेऊन प्रश्न सोडवा अन्यथा दोन गावातील वाद होऊन मोठी घटना घडण्याची शक्यता आहे. अन्यथा रस्त्यासाठी स्थानिक शेतकरी, प्रवासी आत्मदहन करतील असा इशारा देण्यात आला आहे.यावेळी अर्जुन गायकवाड, शहाजी शिलके, औदुंबर बंडगर ,दामोदर बंडगर,सुदर्शन पाटील, सारंग बंडगर , समाधान बंडगर, विष्णू बंडगर, रवी गायकवाड, योगेश गायकवाड शेतकरी, ग्रामस्थ उपस्थित होते.

# भूसंपादनातील दिरंगाईमुळे पालखीची वाट बिकट

## संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाचे काम रखडले

सुराज्य/अकलूज

**आषाढी वारीसाठी महान संतांच्या पालख्या जिल्ह्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपल्या असल्या तरी पालखी महामार्गावरील भूसंपादन विभागातील अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे व गलथान कारभारामुळे लाखो वैष्णवांच्या पालखी मार्गाची वाट बिकट झाली असून पंढरीच्या पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी भाविक भक्तांना खडतर प्रवास करावा लागणार आहे.**



पालखी सोबत येणाऱ्या लाखो वैष्णवांना महाराष्ट्राचे आराध्य दैवत पंढरपूरच्या विठोबारायाचे दर्शन सोयीस्कर व्हावे त्यांचा पायी मार्ग सुखकर व्हावा या हेतूने केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी पालखी महामार्गासाठी कोट्यावधीचा निधी मंजूर केला. यासाठी या महामार्गात भूसंपादित होणाऱ्या जमिनींना अगदी चारपट रक्कम देण्याचे प्रयोजन करण्यात आले मात्र भूसंपादन करणारे अधिकारीच गोलमाल कारभार करणारे निघाल्याने महामार्गावरील प्रश्न मार्गी लागलेले दिसत नाहीत. त्यामुळे अनेक ठिकाणी महामार्गाचे काम रखडले आहे. याचा परिणाम म्हणून वारकऱ्यांची वाट बिकट बनली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार भूसंपादन प्रक्रियेमध्ये संयुक्त समिती नेमण्यात आली होती. यामध्ये कृषी, वनीकरण, सा बां विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,भूमी अभिलेख आणि राष्ट्रीय महामार्ग विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश होता. पण या समितीमार्फत जमीन, घरे, विहिरी, झाडे आणि पाइप लाइन यांचे मूल्यांकन करताना जाणून बुजून त्रुटी ठेवण्यात आल्या.आर्थिक अमिषा पोटी अधिकाऱ्यांनी हा सर्व खेळ खंडोबा केला असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

श्री संत तुकाराम महाराज पालखी महामार्गात माळशिरस तालुक्यातील अकलूज ते तोंडले बोंडले हे अंतर २२ किलोमीटरचे आहे यापैकी अकलूज, माळीनगर, सवतगव्हाण, तांबवे, महाळुंग आदी गावातील अधिग्रहण होणाऱ्यांची प्रकरणे न्यायालयात प्रलंबित असल्याने तर काहींची झाडे, बोरवेल, घरे, विहिरी यांचा उचित मोबदला न मिळाल्याची प्रकरणे प्रलंबित असल्याने त्यांनी जागा रिकामी करून दिली नाही. त्यामुळे रस्ता तयार करताना अडथळा निर्माण होत आहे. यामुळे पालखी महामार्गाचे काम काही ठिकाणी रखडल्याचे परिसरातील नागरिकांतून बोलले जात आहे. अधिकाऱ्यांच्या या दुटप्पी व दुजाभाव करणाऱ्या भूमिकेमुळे काही ठिकाणी पालखी महामार्गाचे काम रखडलेल्या अवस्थेत दिसत आहे. त्यामुळे वैष्णवांना नाहक त्रास सोसावा लागणार असून पंढरीला जाताना खडतर प्रवास करावा लागणार आहे.

या महामार्गावर असेही काही लोक आहेत त्यांना तुमचे भूसंपादनामध्ये काहीही जात नाही असे भूसंपादन अधिकाऱ्यांकडून पत्र देण्यात आलेले आहे .

> भूसंपादन विभागातील संबंधित अधिकाऱ्यांनी वेळेच्या वेळी रखडलेल्या प्रश्नांचा निपटारा न केल्याने व आम्हाला जागा मोकळी करून न दिल्यामुळे काही ठिकाणी रस्त्याची कामे प्रलंबित ठेवावी लागली आहेत. पण वारकऱ्यांच्या सोयीसाठी तात्पुरत्या स्वरुपात रस्त्याची उपलब्धता केली आहे. माळीनगर येथे होणाऱ्या श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील उभ्या रिंगणाला काहीही अडचण येणार नाही अशी व्यवस्था करण्यात आलेली आहे.
>
> **– आय. व्ही. नारायणकर,** प्रकल्प संचालक, राष्ट्रीय महामार्ग विभाग

> भूसंपादनाची अनेक प्रकरणे तांत्रिक बाबीत अडकली आहेत त्यामुळे महामार्गाची कामे प्रलंबित आहेत. या प्रकरणांचा तातडीने निपटारा करून पालखी महामार्गाच्या कामाला गती देण्यात येईल.
>
> **– नामदेव टिळेकर**
>
> प्रांताधिकारी तथा भूसंपादन अधिकारी,अकलूज

## सहकार महर्षि कारखान्याचा १३३ रुपये प्रमाणे दुसरा हप्ता बँक खात्यावर जमा

सुराज्य/अकलूज

येथिल सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि.शंकरनगर अकलूज या कारखान्याचा सन २०२२-२३ चा गळीत हंगामात गाळप केलेल्या उसचा प्रतिटन १३३/ रुपये प्रमाणे दुसऱ्या हप्त्याची रक्कम दि. २१ रोजी बँक खात्यावर वर्ग केला असलेबाबतची माहिती कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांनी दिली.

कारखान्याचे मार्गदर्शक संचालक व महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे कुशल मार्गदर्शनाखाली व चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे नेतृत्वाखाली कारखाना प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे.



सहकार महर्षि साखर कारखान्याचा गळीत हंगाम दि.२४ऑक्टोबर २०२२ रोजी सुरू होऊन दि.२ मार्च २०२३ अखेर १३० दिवसात १०,५६,७८० मे. टन ऊसाचे गाळप करुन १०,४२,५६० क्विंटल साखरेचे उत्पादन झाले आहे.सदर हंगामात साखरेपासून ९.८६ टक्के बी-हेवी मळी उत्पादनापासून१.२९ असा एकुण ११.१५ टक्के साखर उतारा मिळालेला आहे.सदर गळीत हंगामात गाळप झालेल्या ऊसाचा प्रथम अँडव्हान्स रक्कम रू.२,३५०/- प्रति में.टनाप्रमाणे यापुर्वीच ज्या त्या पंधरवड्यामध्ये बँक खातेवर वर्ग करणेत आला होता.आज रोजी दुसरा हप्ता रक्कम रु. १३३/- प्रती मे. टनाप्रमाणे दि. २१/०६/२०२३ रोजी बँक खात्यावर वर्ग केला आसल्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांनी सांगितले.

यावेळी कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख तसेच संचालिका स्वरूपाराणी मोहिते-पाटील,संचालक लक्ष्मण शिंदे,सतीश शेंडगे,नानासाहेब मुंडफणे,विजयकुमार पवार,रावसाहेब मगर,संग्रामसिंह जहागिरदार,रामचंद्र सिद,विराज निंबाळकर,रावसाहेब पराडे, महादेव क्षिरसागर, भिमराव काळे,अमरदिप काळकुटे,गोविंद पवार,सुभाष कटके,जयदिप एकतपुरे, रामचंद्र ठवरे,तज्ञ संचालक प्रकाशराव पाटील,रामचंद्र सावंत पाटील,संचालिका सुजाता शिंदे,कार्यलक्षी संचालक रणजित रणनवरे तसेच कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले व खातेप्रमुख उपस्थित होते.

## बार्शी येथे एका तरुणावर २ ठिकाणी कोयत्याने हल्ला ; दोघाविरुद्ध गुन्हा

सुराज्य/सोलापूर

पूर्वीच्या भांडणावरून एका तरुणावर बार्शी येथील तुळजापूर नाका आणि कोंढारे हॉस्पिटल समोर कोयता, लोखंडी गज आणि लाथाबुक्क्याने हल्ला करून गंभीर जखमी करण्यात आले.ही घटना सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली . या प्रकरणात बार्शीच्या पोलिसांनी दोघाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

युनुस रजाक सय्यद (वय २३ रा.मांगडे चाळ, बार्शी) असे जखमीचे नाव आहे त्याला उपचारासाठी जगदाळे मामा रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणात बार्शीच्या पोलिसांनी अक्षय भवाड आणि अतुल गायकवाड (रा.टिळक चौक बार्शी) या दोघाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे . शेख याला सोमवारी रात्री नऊ वाजता सुमारास तुळजापूर नाका येथे त्यानंतर पुन्हा कोंढारे हॉस्पिटल जवळ त्याच्यावर हल्ला केला . अशी नोंद पोलिसात झाली . पूढील तपास हवालदार माने करीत आहेत.

# विविध संस्थांच्या वतीने जिल्ह्यात योग दिवस साजरा

### विवेकानंद प्रतिष्ठान

**अक्कलकोट** : विवेकानंद प्रतिष्ठान व पतंजली योग समिती यांच्या संयुक्त विद्यमानाने आज विठ्ठल मंदिर प्रांगण येथे भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन प्रतिष्ठानचे अध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, जेष्ठ नेते प्रभाकर मजगे, आरपीआय तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे, मल्लिकार्जुन मसूती, कल्याणराव पाटील, निंगम्माताई हिंडोळे, पाटील ताई व योगशिक्षक माणिक माशाळे व परमेश्वर गुरव उपस्थित होते.

योग शिबिरास विलास कोरे, राजशेखर उंबराणीकर, नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, विजयकुमार पाटील, दयानंद बिडवे, डॉ.सतीश बिराजदार, मलकप्पा भरमशेट्टी, कांत झिपरे, वीरेंद्र पाटील, राजेंद्रमहाराज सुरवसे, दत्तात्रय कटारे, अंकुश चौगुले,अतिश पवार,अशोक जाधव, सिध्दू माळी, सचिन पाटील, रवी बिराजदार, समर्थ होळा,गीत पवार, प्रकाश पाटील व प्रतिष्ठानचे पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वनाथ देवरमनी तर आभार चंद्रकांत दसले यांनी मानले.

### हंजगी आश्रम शाळा

**अक्कलकोट** : आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून दरवर्षी २१ जून हा दिवस जगभरात साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रांनी देखील या दिनाला मान्यता दिली आहे. कारण शरीर आणि मन निरोगी ठेवण्यासाठी योग करणे गरजेचे मत जेऊर केंद्राचे केंद्र प्रमुख गंगाधर जमादार यांनी येथे बोलताना व्यक्त केले.आज जागतिक योग दिनानिमित्त हंजगी आश्रम शाळेला भेट देऊन विद्यार्थी व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बांधवांना योग दिनाचे महत्त्व पटवून देताना केंद्र प्रमुख गंगाधर जमादार हे बोलत होते.यावेळी मुख्याध्यापक,शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कल्याणशेट्टी शिक्षण संकुल

**अक्कलकोट** : महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सौ. सुरेखा कल्याणशेट्टी मराठी व सेमी इंग्रजी माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज ,मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालय, गिरजामाता मराठी व सेमी इंग्रजी प्राथमिक विद्यालय,नालंदा विद्यार्थी वसतीगृह व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांच्या वतीने योगदिना निमित्त योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून अक्कलकोट पतंजली योग समितीचे समन्वयक डी सी सी बँक वागदरीचे व्यवस्थापक परमेश्वर गुरव, संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी ज्युनियर कॉलेज विभाग प्रमुख पुनम कोकळगी, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी व पर्यवेक्षक मोतीलाल चव्हाण हे उपस्थित होते. यावेळी पुनम कोकलगी मॅडमनी एक्यूप्रेशर क्ल्यापिंग हा संगीतमय प्रकार घेण्यात आला. यावेळी प्राथमिक मुख्याध्यापक सुरेश आवटे, प्रा राजशेखर पवार, प्रा खंडेराव घाटगे,निखिल भालेराव शिक्षक , कर्मचारी ,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गृहविज्ञान महिला महाविद्यालय

**अकलूज** : येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित व एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ मुंबई संलग्नित श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील गृहविज्ञान महिला महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योगा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सौ .हेमलता मुळीक व सौ. उज्वला तानवडे या उपस्थित होत्या. सौ. मुळीक यांनी विद्यार्थिनींना योग साधना व ध्यानधारणा याचे शारीरिक व मानसिक आरोग्यातील महत्त्व व आपल्या सकारात्मकतेवर होणारा परिणाम



याविषयी मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. खंडप्पा कोरे तसेच आभार प्रदर्शन डॉ .भारती भोसले, सूत्रसंचालन तृतीय वर्षाची विद्यार्थिनी कु. शिवानी हेगडे हिने केले. या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे , डॉ. जयश्रीला मनोहर, डॉ. छाया भिसे, प्रा. अमित घाडगे, डॉ. राजश्री निंभोरकर, डॉ. ऋषी गजभिये व अविनाश पताळे, सुनीता काटे व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

### शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूल

**अकलूज** :'तन, मन, आत्मा आणि बुद्धी यांची सांगड घालण्यासाठी नियमित योगा करण्याचा निर्धार करून निरोगी आयुष्याचा मंत्र जपूया' असा संदेश घेऊन शिवरत्न शिक्षण संस्था संचलित शिवरत्न सेमी इंग्लिश मिडीयम स्कुल मध्ये योगा दिवस अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

योगाचे प्रात्यक्षिक दाखवण्यासाठी महर्षी प्रशाला - यशवंतनगर येथे व्यवसाय विभागामध्ये कार्यरत असलेले योगशिक्षक धनंजय देशमुख हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख पाहुण्यांचा सत्कार प्रशालेचे मुख्याध्यापक जितेंद्र माने देशमुख यांचे शुभहस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशालेतील शिक्षिका सुवर्णा निंबाळकर यांनी तर आभार




प्रदर्शन अनुष्का बर्गे यांनी केले.

### विज्ञान महाविद्यालय सांगोला

**सांगोला** : विद्यार्थी जीवनात योग व प्राणायाम यांचा सराव सुरू केल्यास निरोगी आणि आनंदी जीवन जगता येईल. निरोगी आरोग्यासाठी योग सर्वात प्रभावी उपाय असल्याचे मत सांगोला विधानसभा मतदारसंघ प्रमुख तथा भाजपचे तालुकाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी व्यक्त केले.

विज्ञान महाविद्यालय सांगोला येथे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना चेतनसिंह केदार-सावंत बोलत होते. यावेळी तहसीलदार संजय खडतरे, मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी, पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ बाबासाहेब देशमुख, सूत गिरणीचे चेअरमन डॉ.प्रभाकर माळी, विज्ञान महाविद्यालयाचे ,प्राचार्य मुलाणी , सिए के.एस.माळी, रत्नप्रभा माळी, शिवाजीराव गायकवाड, दत्ता नवले, डॉ.अनिल कांबळे, दत्तात्रय पांचाळ, डॉ.विजय बाबर यांच्यासह योग प्रशिक्षक भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शासकीय अधिकारी, नागरिक उपस्थित होते.

### कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विदयालयात आज आंतराष्ट्रीय योगा दिनानिमित्त आज सर्व विद्यार्थ्यांना योगाचे धडे देण्यात आले तसेच योगाचे जिवनात महत्व विदयार्थयाना समजावुन सांगण्यात आले.

### श्रीनाथ विद्यालय बोरगाव

**श्रीपूर** : श्रीनाथ विद्यालय व कै. विजयकुमार उर्फ बाबासाहेब शंकरराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय बोरगाव मधील विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायत कार्यालय, बोरगाव समोरील मैदानावर योगासने व प्राणायाम सादर करीत जागतिक योग दिन साजरा केला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्रीनिवास गज्जम यांनी जागतिक योग दिनाचे महत्त्व सांगून प्रास्ताविक सादर केले. विद्यालयाचे पर्यवेक्षक लष्कर आर. टी. यांनी सर्व विद्यार्थ्यांकडून योगासने करून घेतली. यामध्ये वृक्षासन, संतुलनासन, ताडासन, त्रिकोणासान, पद्मासन , पर्वतासान, पवनमुक्तासन, सर्वांगासन, हलासन, भुजंगासन, धनुरासन, प्राणायाम, अनुलोम, विलोम, भ्रामरी, कपाल भाती, ओमकार आदी आसने विद्यार्थ्यांनी सादर केली. यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य व स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन राजकुमार पाटील, प्राचार्य कांबळे के. टी. उपमुख्याध्यापक भुजबळ एम एस, आदी मान्यवरांनी विद्यार्थ्यांबरोबर योगासने सादर केली.

### मोडनिंब युवा भारत

**मोडनिंब** : योगाने निरोगी जीवन लाभते. धकाधकीच्या व ताणतणाव असलेल्या रोजच्या जीवन शेलीत आजारावर मात करण्यासाठी योगासने आवश्यक असल्याचे प्रतिपादन समाज कल्याणचे माजी सभापती शिवाजी कांबळे यांनी सांगितले ते मोडनिंब येथे आयोजित



जागतिक योगदिनाच्या निमित्ताने मोडनिंब युवा भारत सोलापूर व मोडनिंब, पतंजली युवा ग्रुप तसेच विधी सेवा समिती माढा यांच्या संयुक्त विद्यमाने योगदिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी योगेश आखरे,न्यायाधीश शुभम लटुरीया,हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष कैलास तोडकरी माजी सरपंच दत्ता बापु सुर्वे, अनिल आप्पा शिंदे, उपस्थित होते. या शिबिरात पतंजली युवा भारतचे जिल्हा प्रमुख मोहन कुंभार, सहप्रमुख तथा योगशिक्षक महेश पवार,व जिल्हा संरक्षक निलेश गिड्डे यांनी उभी आसणे,सुर्यनमस्कार,बैठी आसने, पाठ,पोट या अवयवांना उपयोगी पडणारी आसणे,व कपालभाती, भ्रामरी,ओंकार, ध्यान, धारणा,अनुलोम विलोम, प्रार्थना,शांतीपाठ इत्यादीसह सविस्तर योग करवून घेतला. घेतला. सूत्रसंचालन मोहन कुंभार यांनी केले.

### बार्शी शहर व तालुका

**बार्शी** : बार्शी शहरात विविध शाळा, महाविदयालये तसेच संस्थांच्यावतीने जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. उत्तम आरोग्याच्या दृष्टीने योगाचे असलेले महत्व यानिमीत्ताने अधोरेखित करण्यात आले.

### महाराष्ट्र विदयालय बार्शी

योगासनाची सुरुवात विद्यालयातील सहशिक्षक सुरेश महामुनी यांनी केल्यानंतर कर्मवीर योगासने व प्राणायाम केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने योगाचे प्रात्यक्षिके हिमानी राऊत (नॅशनल योगा प्लेयर) व स्नेहा वेदपाठक या दोघींनी योग प्रोटोकॉल नुसार प्रात्यक्षिके व त्याचे महत्त्व याबद्दलची माहिती दिली. सूत्रसंचालन प्रा.किरण गाढवे यांनी केले. संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे, माजी प्राचार्य चंद्रकांत मोरे ,कर्मवीर योगासन केंद्रातील पदाधिकारी , क्रीडोत्तेजक मंडळातील पदाधिकारी , तसेच विद्यालयाच्या प्राचार्या के.डी.धावणे, उपमुख्याध्यापक आर.बी.सपताळे , क्रीडा शिक्षक अनिल पाटील, योगेश उपळकर, पुष्कराज पाटील, सर्व विद्यार्थी व सर्व शिक्षक उपस्थित होते.

### कुंकूलोळ हायस्कूल व प्राथमिक विदयामंदीर :

कुंकूलोळ हायस्कूल व प्राथमिक विद्यामंदिरमध्ये योग दिवस साजरा करण्यात आला. शाळेच्या प्रांगणात इ. १ ते १० वी च्या विद्यार्थी विद्यार्थिनींना अंबिका योग कुटीर केंद्राच्या सूर्यकांत वायकर, योगेश गुंदेचा, संजय स्वामी, राहुल नरवडे या प्रशिक्षकांनी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. ९५० विद्यार्थ्यांबरोबरच मुख्याध्यापक, शिक्षक शिक्षकेतर अशा एकूण २१ कर्मचारी यांनी देखील प्राणायाम, योगासने केली. प्रास्ताविक संतोष खुडे व सूर्यकांत वायकर यांनी केले. अभिमन्यू सातपुते यांनी आभारप्रदर्शन केले. दिलीप महंकाळे यांनी सुत्रसंचलन केले. संस्थेचे खजिनदार मोहन बुचडे, हायस्कूलचे मुख्याध्यापक विजयकुमार गुळमिरे, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका योगिता बेळे यावेळी उपस्थित होते.

### जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कासारवाडी

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कासारवाडी येथे योग शिबीराचे आयोजन करण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापक सुधाकर बडे यांनी केले. योगशिक्षक शशिकांत बसनगौडर यांनी मुक्त हालचाल, वज्रासन, भुजंगासन, धनुरासन, नौकासन, पद्मासन, वक्रसान, शीर्षासन, शवासन इत्यादी आसने विद्यार्थ्यांकडून करून घेतली. यावेळी योग अभ्यासाची सखोल माहिती पदवीधर शिक्षक राजीव कांदे यांनी दिली. सदर योग शिबिरास विद्यार्थी तसेच सरपंच मंडलिक, उपसरपंच सुधीर गायकवाड, शाळा व्यवस्थापन समितिच्या अध्यक्षा विद्या मंडलीक, सहशिक्षीका दरेकर, रेणुका मुंढे, मनिषा भोसले, व्दारका पिंपळे उपस्थित होत्या. योग शिबीर कार्यक्रमाचा समारोप व आभार प्रदर्शन उपशिक्षक बाळासाहेब मुंढे यांनी मानले.

# निवडणूक म्हणजे हिंसाचाराचा परवाना नाही

## पश्चिम बंगाल सरकारला सर्वोच्च न्यायालयाने खडसावले

सुराज्य/पश्चिम बंगाल

पश्चिम बंगालमध्ये ८ जुलै रोजी पंचायत निवडणुकीच्या ७५ हजार जागांसाठी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. यावेळी कायदा-सुव्यवस्था राखली जावी, यासाठी केंद्रीय दले तैनात करण्याची व्यवस्था करावी, असे निर्देश उच्च न्यायालयाने दिले होते. त्याला आव्हान देणारी याचिका राज्य सरकार आणि राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात केली होती.

न्या. बी. व्ही. नागरत्ना आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या सुटीकालीन पीठाने ही याचिका फेटाळताना नमूद केले, की पंचायत समित्यांच्या अनेक जागांवरील एकाच दिवशी निवडणुका होत आहेत. मतदान मुक्त वातवरणात आणि कोणत्याही गैरप्रकारांविना व्हावे,

> पश्चिम बंगालमध्ये मुक्त वातावरणात निवडणुका व्हाव्यात, या हेतूनेच उच्च न्यायालयाने आदेश दिले, ही वस्तुस्थिती आहे. एकाच दिवशी मतदान होणाऱ्या या निवडणुकीतील मतदानकेंद्रांची संख्या बघता उच्च न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेपाची गरज वाटत नाही.
>
> – सर्वोच्च न्यायालय

याच उद्देशाने उच्च न्यायालयाने केंद्रीय दले तैनात करण्याचे निर्देश दिले आहेत, ही वस्तुस्थिती असल्याचे दिसते. यात आम्ही कोणताही हस्तक्षेप करण्याची गरज नाही.

निवडणुकांसाठी केंद्रीय दले मागविण्याची बाब आयोगाच्या अखत्यारित येत नसल्याचा दावा राज्य निवडणूक आयोगाने याचिकेत केला होता. त्यावर सर्वोच्च न्यायालय म्हणाले की, जर हिंसाचारामुळे लोकांना उमेदवारी अर्ज भरता येत नसतील, ज्यांनी अर्ज भरले त्यांना संपविले जात असेल, गटागटांत चकमकी होत असतील, तर मग निवडणूक प्रक्रिया मुक्त आणि योग्यपणे कशी पार पडेल? यावर राज्य सरकारचे वकील म्हणाले की, कधी कधी जे भासते त्यापेक्षा वस्तुस्थिती वेगळी असू शकते.



**घटनाक्रम**– ● भाजप नेते सुवेंदू अधिकारी आणि काँग्रेस खासदार अधीररंजन चौधरी यांची कलकत्ता उच्च न्यायालयात याचिका ● यापूर्वी निवडणुकांत मोठ्या प्रमाणात हिंसाचार झाल्याचा दावा ● केंद्रीय दलांची तैनाती व उमेदवारी अर्ज भरण्याची मुदतवाढीची मागणी ● १३ जून रोजी संवेदनशील भागांत केंद्रीय दलांना पाचारण करण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश ● १५ जून रोजी ४८ तासांत केंद्रीय दले तैनात करण्याचे आदेश ● सुरक्षा आराखडा तपासून निमलष्करी दले तैनात करण्याची सूचना ● संवेदनशील भाग जाहीर करण्यास निवडणूक आयोगाकडून विलंब ● केंद्र सरकारला केंद्रीय दले पाठविण्याचे आदेश ● या सुरक्षेचा आर्थिक भार केंद्राने उचलण्याचे निर्देश

### तृणमूल काँग्रेसचा नैतिक पराभव : भाजपची टीका

सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय म्हणजे ममता बॅनर्जी सरकारसाठी एक धडा आहे. हा तृणमूल काँग्रेसचा नैतिक पराभव आहे, अशी टीका भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी यांनी केली. राज्य सरकार हिंसाचार करणाऱ्यांची पाठराखण करतेच, शिवाय हा हिंसाचार थांबविण्यासाठी जे प्रयत्न होतात, ते फोल करण्यासाठी घटनात्मक आयुधांद्वारे सर्वोच्च न्यायालयापर्यंतही धाव घेते, असा आरोप त्यांनी केला.

### आम्हीच जिंकणार, तृणमूलचा दावा

कोलकाता : सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा निवडणूक निकालांवर काहीही परिणाम होणार नाही. या निवडणुका तृणमूल काँग्रेसचा जिंकेल, असा दावा तृणमूल काँग्रेसचे खासदार सौगत राय यांनी केला. न्यायालयाच्या निर्णयाचा आम्ही आदर करतो. त्याचे पालन होईल. पण ग्रामीण निवडणुकांसाठी आम्हाला केंद्रीय दले नकोत, ही दले आल्यास केवळ गोंधळात भर पडेल असे ते म्हणाले.

## महत्त्वाचे वृत्त



### हवामान खात्याचा मोठा दिलासा

**नागपूर :** हवामान खात्याने मुंबईकरांना गोड दिलासा दिला असून उद्या, २२ जूनला मुंबईत मध्यम तर २३ व २४ जूनला मुसळधार पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. मात्र, सातत्याने बदलणाऱ्या खात्याच्या अंदाजावर आता समाजमाध्यमांवरही प्रश्नचिन्ह उभे केले जात आहे. जून महिन्याचा उत्तरार्ध आला तरी मान्सून दडी मारून बसला आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मान्सूनने हजेरी लावलेली नाही. मात्र, येत्या चार दिवसांत वातावरणात बदलाचे संकेत हवामान खात्याने दिले असून राज्यात मेघगर्जनेसह मुसळधार ते हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. राज्यातील जवळपास सर्वच भागांत येत्या चार दिवसांत पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

### जन्मदात्या बापाचे किळसवाणे कृत्य

**धाराशिव :** चार दिवसांपूर्वी सगळीकडे जागतिक पितृदिवस साजरा केला जात असताना त्याच दिवशी जन्मदात्या बापाने पोटच्या मुलीसोबत केलेला किळसवाणा प्रकार समोर आला आहे. सततच्या लैंगिक शोषणामुळे मुलीला दिवस गेले असून सध्या ती तीन महिन्यांची गरोदर आहे. बापाच्या नात्याला काळिमा फासणाऱ्या या संतापजनक प्रकरणी उमरगा तालुक्यातील एका पोलीस ठाण्यात तीन दिवसांपूर्वी गुन्हा दाखल करण्यात आला. नराधमाची सुरुवातीला पोलीस आणि त्यानंतर न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे.

### उदयनराजे-शिवेंद्रसिंहराजे यांच्यात राडा

**सातारा :** पुणे बंगळूर महामार्गावर साताऱ्यात खिंडवाडी गावच्या हद्दीत कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नूतन जागेचे भूमिपूजन करण्यावरून खासदार उदयनराजे आणि आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले कर्यकर्त्यांसह समोरासमोर आले. उदयनराजे समर्थकांनी भूमीपूजनाचा कार्यक्रमच उधळून लावला. यामुळे तणावाचे वातावरण झाले. दोन्ही गटांनी जागेवर दावा केला. यामुळे दोन्ही राजेंमधील वाद पुन्हा एकदा उफाळून येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या ठिकाणी असलेलं साहित्य फेकून दिले आहे, तर कंटेनर पलटी केला. त्यामुळे दोन्ही राजेंमधील वाद पुन्हा एकदा उफाळून येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### वारकऱ्यांना मोफत विमा संरक्षण

**मुंबई :** पंढरपूरच्या विठुरायाच्या दर्शनासाठी महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातून दिंड्या-पालख्या निघाल्या आहेत. २९ जून रोजी आषाढी एकादशी आहे. २८-२९ जूनला या सगळ्या दिंड्या चालत पंढरपुरात दाखल होतील. दरवर्षी लाखो वारकरी पायी चालत शेकडो किलोमीटर अंतर पार करून पंढरपूरला जातात. परंतु या प्रवासादरम्यान अनेकदा वारकरी आजारी पडतात, दुखापतग्रस्त होतात, एखाद्या अपघातात किंवा दुर्घटनेत लोकांचा मृत्यू होतो. या सर्व वारकऱ्यांसाठी राज्य सरकारने विमा संरक्षण दिलं आहे. यामुळे शासनाच्या खर्चाने विमा संरक्षण मिळणार आहे. वारीच्या ३० दिवसांसाठी हे विमा संरक्षण असेल.

### सिध्दरामय्या यांची सांगलीत सभा

**सांगली :** बालेकिल्ला अशी एकेकाळी असलेली सांगलीची ओळख पुन्हा एकदा निर्माण करण्यासाठी काँग्रेसने शेजारच्या कर्नाटकातील विजयाचा आधार घेण्याचे निश्चित केले आहे. एकीकडे महाविकास आघाडीतील जागा वाटपाचा निर्णय वरिष्ठ पातळीवर सोडून भाजपच्या आक्रमक प्रचाराला तोंड देण्यासाठी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना सांगलीत आमंत्रित करण्यात आले असून, त्यांच्या सत्काराच्या निमित्ताने आक्रमकपणे भाजपसोबतच आघाडीअंतर्गत असलेल्या स्पर्धक राष्ट्रवादीला शह देण्याचा प्रयत्न काँग्रेसकडून केले जात आहेत.

### राज्यात उष्माघाताचे २६०० रुग्ण

**मुंबई :** राज्यामध्ये यंदा मोठ्या प्रमाणात उकाडा वाढल्यामुळे उष्माघाताच्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे. यंदा राज्यामध्ये मार्च ते जून या साडेतीन महिन्यांमध्ये उष्माघाताचे तब्बल २ हजार ६४९ संशयित रुग्ण आढळून आले आहेत. तर १२ जणांचा मृत्यू झाला आहे. उष्माघाताचे सर्वाधिक रुग्ण रायगड, वर्धा, नागपूर या जिल्ह्यांमध्ये आढळले आहेत, तर अहमदनगर, धुळे आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये रुग्णांची शून्य नोंद झाली आहे. यंदा मार्चच्या सुरुवातीपासून वाढत्या पाऱ्यामुळे नागरिक हैराण झाले होते. त्यातच जूनमध्ये पावसाला होत असलेल्या विलंबानेही उन्हाचा पारा चढाच राहिला आहे. त्यामुळे नागरिकांना दुपारी घरातून बाहेर पडणे मुश्किल झाले होते.

### शिक्षकाचे घृणास्पद कृत्य

**अहमदनगर :** जामखेड शहरातील एका शिक्षकाने आपल्याच शाळेतीत शिकत आसलेल्या एका १४ वर्षीय विद्यार्थीनीला शाळेच्या अभ्यासाचं कारण देत तिच्याशी स्नॅपचॅट अँपच्या माध्यमातून जवळीक साधली. यानंतर बालकास अर्धनग्न फोटो पाठविण्यास सांगितले. ते फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देवून तिच्यावर आष्टी इथल्या लॉजवर बलात्कार केला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून पोलीस तपास सुरू असल्याची माहिती आहे.

### संपूर्ण ठाकरे कुटुंबियांच्या सुरक्षितेत कपात


**मुंबई :** मुंबई महापालिकेतील कथित कोविड घोटाळ्याप्रकरणी ईडीचे छापे सुरू असताना दुसरीकडे शिंदे-फडणवीस सरकारने ठाकरे कुटुंबाला मोठा झटका दिला आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना देण्यात आलेली झेड प्लस सुरक्षा काढून घेण्यात आली आहे. उद्धव ठाकरेंच्या ताफ्यातील अतिरिक्त वाहनं आणि मातोश्री बाहेरील सुरक्षेतही कपात केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना असलेली झेड प्लस सुरक्षा काढून त्यांना आता वाय प्लस सुरक्षा देण्यात आली आहे. तर आदित्य ठाकरे यांची वाय प्लस सुरक्षा काढून त्यांना वाय दर्जाची सुरक्षा देण्यात आली. यासोबतच रश्मी ठाकरे, तेजस ठाकरे यांची सुरक्षाही कमी करण्यात आली असल्याची माहिती विश्वासनीय सूत्रांनी दिली आहे.

### स्कूल बस चालविताना चालकाला हार्टअ‍ॅटॅक

**लातूर :** शाळेत घेऊन जाणाऱ्या बसचालक, रिक्षावाल्या काकांशी विद्यार्थ्यांचे चांगलेच आपुलकीचे नाते असते. विशेष म्हणजे आपली मुलं रिक्षा, बसचालकाच्या हवाली करताना पालकांमध्येही विश्वासाहर्ता असते. याच विश्वासाला लातूरमधील एका स्कूल बसचालकाने सार्थ ठरवले आहे. एसटी महामंडळात चालक म्हणूण निवृत्त झालेले भोपलकर हे स्कूलबसवर चालक म्हणून रूजू झाले होते. त्यांना बस चालवताना हृदयविकाराचा झटका आल्यावरही लातूरमधील बसचालकाने प्रसंगावधान राखत २५ चिमुकल्यांचा जीव वाचवला आहे. खऱ्या आयुष्यातील रिअल हिरोचा प्रत्यय लहानग्यांना आला.

## आता प्रत्येक ट्रकमध्ये 'एसी' बंधनकारक

सुराज्य/नवी दिल्ली




देशातील ट्रक चालकांसाठी आनंदाची बातमी आहे. केंद्रीय रस्ते, वाहतूक व दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांनी महत्वाची घोषणा केली आहे. यानुसार आता देशातील प्रत्येक ट्रकमध्ये चालकाच्या केबिनमध्ये एसी बसवणे बंधनकारक करण्यात येणार आहे.

२०२५ पासून हा निर्णय लागू होणार आहे. नितीन गडकरींनी हा नियम लागू करण्याच्या प्रस्तावावर स्वाक्षरी केली आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, वाहन उद्योगाला या नियमानुसार बदल करण्यासाठी १८ महिन्यांचा वेळ आवश्यक आहे. रस्ते, वाहतूक मंत्रालयाने पहिल्यांदा २०१६ मध्ये याबाबतचा प्रस्ताव आणला होता.

नितीन गडकरी म्हणाले, आपल्या देशात काही चालक १२ ते १४ तास गाडी चालवतात. इतर देशांमध्ये बस आणि ट्रक चालकांच्या कामाचे तास निश्चित करण्यात आले आहेत. आपल्या देशात चालक ४३ ते ४७ अंश सेल्सियस तापमानात गाडी चालवतात. यावरून आपण आपल्याकडील चालकांच्या परिस्थितीचा अंदाज लावू शकतो.

मी जेव्हा मंत्री झालो तेव्हाच मी ट्रकमध्ये एसी केबिन सुरू करण्यास इच्छूक होतो. मात्र, काही लोकांनी यामुळे खर्च वाढेल असे म्हणत याला विरोध केला. मात्र, आज (१९ जून) मी या निर्णयाच्या फाईलवर स्वाक्षरी केली आहे, असे ही नितीन गडकरींनी नमूद केले.

## धो-धो बरसणार पाऊस, कोकणात अलर्ट

सुराज्य/मुंबई

महाराष्ट्रात रखडलेला मान्सून आता लवकरच वेग घेणार असल्याची माहिती हवामान खात्याकडून देण्यात आली आहे. मोसमी वाऱ्यांच्या पुढच्या वाटचालीसाठी सध्या पोषक स्थिती निर्माण झाली आहे. अशात चक्रीवादळही पुढे सरकल्यामुळे मान्सूनचा मार्ग मोकळा झाली आहे. यामुळे राज्यात पुढच्या ३ दिवसांमध्ये मान्सून दाखल होईल असा इशारा हवामान खात्याकडून देण्यात आला आहे.

हवामान विभागाच्या मुंबई आणि नागपूर केंद्राने यासंबंधी माहिती दिली आहे. तर भारतीय हवामानशास्त्र पुणे विभागाचे प्रमुख के. एस. होसाळीकर यांनीही यासंबंधी ट्वीट केलं आहे. त्यामध्ये त्यांनी लिहलं की, '२३ जूनपासून कोकणातील काही भागांत, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भामध्ये पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे तर २४-२५ जूनपासून पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज वर्तवला आहे. दरम्यान, मराठवाडामधील काही भागात मेघगर्जनेसह पावसाची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे.'



दरम्यान, हवामान खात्याच्या अंदाजानुसार, मराठवाडा व विदर्भात २२ ते २३ जूननंतर पावसाला सुरुवात होण्याची दाट शक्यता आहे. विशेष म्हणजे २५ जूननंतर सर्वत्र चांगल्या पावसाला शक्यता आहे, असेही औंधकर यांनी 'मटा'शी बोलताना सांगितले. खरंतर, पावसाच्या उशिरा दाखल होण्यामुळे पेरण्या खोळंबल्या आहेत. पण आता जूनच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत मान्सून सर्वत्र दाखल होईल.

इतकंच नाहीतर नाशिक, अहमदनगर, सातारा, सांगली, बीड, सोलापूर, लातूर, नांदेड, जालना, बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये आज विजांच्या कडकडाटासह पाऊस होईल अशी शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे.

## स्वस्तात सोन्याचे आमिष दाखवून २५ लाखांचा गंडा

सुराज्य/सांगली

स्वस्तात सोने देण्याचे आमिष दाखवुन २५ लाखाचा गंडा घालणाऱ्या टोळीतील दोन महिलासह चौघांना पुणे-बंगळूर महामार्गावरील आणेवाडी पथकर नाक्यावर पकडण्यात आल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे निरीक्षक सतीश शिंदे यांनी बुधवारी सायंकाळी दिली. त्यांच्याकडून लुटीतील साडे बारा लाख जप्त करण्यात आले आहेत.

स्वस्तात सोने देतो असे सांगून पुण्यातील व्यापारी मयूर जैन यांना मंगळवारी सांगलीतील फळमार्केट जवळ बोलावले.अशोक रेड्डी याच्यासह अन्य सहकाऱ्यांच्या टोळीने सोन्याचे बिस्किट दाखवून विश्वास संपादन केला. २५ लाख रुपये घेतले, मात्र सोने न देता पोलीस आल्याचे सांगत पोबारा केला. याबाबत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल होताच तातडीने सातारा पोलीसांना कळवण्यात आले. संशयित पुण्याच्या दिशेने जात असल्याचे सांगितले. भुईंज पोलीसांनी आणेवाडी येथे नाकाबंदी केली. जीपमधून (एमएच १२ पीझेड ७९९२) जात असलेल्या चौघांना ताब्यात घेऊन झडती घेतली असता लुटीतील साडेबारा लाख रुपये मिळाले. यातील संशयित प्रशांत निंबाळकर (वय ४८, रा. नांदूर, जि. बुलढाणा), प्रवीण खिराडे (वय ३७, रा. खामगाव, जि. बुलढाणा), मानसी शिंदे व नम्रता शिंदे (दोघी रा. सारोळा, ता.मुळशी) यांना अटक करण्यात आली आहे. चौघांना

## 'टास्क फोर्स'च्या अध्यक्षपदी डॉ. दीपक सावंत

**अमरावती :** राज्यात कुपोषणाला आळा घालण्यासाठी, तसेच बालमृत्यू, मातामृत्यूंचे प्रमाण कमी व्हावे, या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या टास्क फोर्स'च्या अध्यक्षपदी माजी आरोग्यमंत्री डॉ. दीपक सावंत यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या नियुक्तीची घोषणा केली असून या टास्क फोर्स'मध्ये महिला बाल विकास, आरोग्य, आदिवासी, कृषी, अन्न व नागरी पुरवठा विभागांचे अप्पर सचिव, सचिव, प्रधान सचिव, आयुक्त यांचा समावेश आहे. राज्याचे माजी आरोग्य मंत्री डॉ. दीपक सावंत यांच्या राज्याच्या कुपोषण निर्मुलनातील उल्लेखनीय योगदान लक्षात घेऊन त्यांची राज्याच्या कुपोषण निर्मुलन टास्क फोर्सच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. भाजपा-शिवसेना युती सरकारच्या काळात डॉ. दीपक सावंत हे आरोग्यमंत्री होते, पण विधान परिषद सदस्यत्वाची मुदत संपूनही पुन्हा संधी न देण्यात आल्याने त्यांनी राजीनामा दिला होता.

## ठाण्यात १३७ कोटींचा धान्यघोटाळा उघड

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील शहापूर विभागात आदिवासी विकास महामंडळाच्या धान्य खरेदीमध्ये झालेल्या १३७ कोटी रुपयांच्या घोटाळाप्रकरणी शासनाच्या निधींचा गैरवापर करून आर्थिक फसवणूक केल्याचा ठपका ठेवत प्रादेशिक व्यवस्थापक विजय गांगुर्डे आणि अन्य तीन अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. आमदार संजय केळकर यांनी वर्षभर पाठपुरावा केल्यानंतर ही कारवाई झाली आहे. या अधिकाऱ्यांची लाचलुचपत विरोधी विभागामार्फत चौकशी करण्याची मागणीही केळकर यांनी केली आहे.

महामंडळाच्या शहापूर कार्यालयामार्फत २०१९-२० ते २०२१-२२ या हंगामात धान्य खरेदीत कोट्यवधींचा भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी आदिवासी बांधव आणि शेतकऱ्यांनी आमदार संजय केळकर यांच्याकडे केल्या होत्या. धान्यखरेदी योजनेत कोट्यवधींचा भ्रष्टाचार अधिकारी, व्यापारी आणि राष्ट्रवादीच्या एका लोकप्रतिनिधींच्या संगनमताने झाल्याचा आरोप आमदार संजय केळकर यांनी करून या प्रकरणाची एसआयटी'मार्फत चौकशी करण्याची मागणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावित यांच्याकडे केली आहे. आमदार संजय केळकर यांनी हा विषय सातत्याने विधानसभेत मांडून दोषींविरुद्ध कारवाईची मागणी केली होती. अखेर प्रशासनाने उच्चस्तरीय समिती नेमून अहवाल सादर केला. या अहवालात गंभीर बाबी उघड झाल्या आहेत. इतर राज्यातील तांदूळ आणून कागदोपत्री धान्य जावक दाखवण्यात आली.

## यवत येथे भीषण अपघात, दोघांचा मृत्यू

सुराज्य/दौंड

पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर दौंड तालुक्यातील यवत इथे रस्ता ओलांडत असणाऱ्या एका पादचाऱ्याला दुचाकीची धडक बसल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. तर दुचाकीवरील गंभीर जखमी दोघांपैकी एकाचा एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. तर दुसऱ्यावर उपचार सुरू आहेत. ही धक्कादायक घटना मंगळवारी (ता.२०) रात्री साडेदहाच्या दरम्यान घडली.

दादासाहेब सोमनाथ मदने (वय ३८, वर्षे रा.दापोडी, ता.दौंड जि.पुणे), प्रज्वल महेंद्र शेळके (रा.केडगांव, ता.दौंड जि.पुणे) अशी अपघातात मृत्यू झालेल्यांची नावे असून, विवेक विकास बारवकर (रा.केडगांव ता.दौंड जि.पुणे) याच्यावर उपचार सुरू आहेत.



अधिक माहिती अशी की, यवत इथे दुचाकीवरून जात असलेले प्रज्वल शेळके व विवेक बारवकर यांच्या दुचाकीची महामार्ग ओलांडत असणारे मदने यांना दुचाकीची धडक बसली. या अपघातात मदने यांचा जागीच मृत्यू झाला तर दुचाकीवरील दोघे गंभीर जखमी झाले होते. त्यांना उपचारासाठी दवाखान्यात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान प्रज्वल शेळके याचा आज मृत्यू झाला. केडगाव येथील एक हसतमुख तरुण, कायम नवीन काहीतरी करायचे या जिद्दीने नवनवीन उपक्रम राबविण्याकडे कल असलेला प्रज्वल शेळके याचा अपघाती मृत्यू झाल्याने दौंड तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे.

## आता पंतप्रधान व्हा म्हणताच मान डोलवली

सुराज्य/पुणे



**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे महाराष्ट्रातला एक सक्षम नेता म्हणून पाहिलं जातं. देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यातल्या एका कार्यक्रमात उपस्थिती दर्शवली होती. देवेंद्र फडणवीस हे महाविकास आघाडीची सत्ता गेल्यानंतर गेल्यानंतर मुख्यमंत्री होतील असं अनेकांना वाटलं होतं. मात्र ते उपमुख्यमंत्री झाले. असं असलं तरीही त्यांनी मुख्यमंत्री व्हावं असं अनेकांना वाटतं. एवढंच नाही तर देवेंद्र फडणवीस हे केंद्रातही उत्तम काम करु शकतील असा विश्वासही त्यांच्या समर्थकांना वाटतो. पुण्यातल्या कार्यक्रमात भावी मुख्यमंत्री नाही तुम्ही आता भावी पंतप्रधान व्हायला हवं असं आयोजक म्हणाले. त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी केलेली कृती सूचक ठरली.**

पुण्यात प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन संस्थेच्या नव्या इमारतीचा शुभारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मॉडर्नस कॉलेजच्या नव्या इमारतीचं उद्घाटन करण्यात आलं. शिवाजीनगर येथे हा सोहळा पार पडला.

या कार्यक्रमाचे आयोजक बोलत होते तेव्हा ते म्हणाले देवेंद्रजी आता भावी मुख्यमंत्री नको भावी पाच आकडी शब्द! भावी पंतप्रधान असं आयोजकांनी सुचवलं.

गजानन एकबोटे हे या कार्यक्रमाचे आयोजक होते. त्यांनीच हे वक्तव्य केलं. ज्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी मान डोलवली आणि हात जोडले. यानंतर तुम्ही नाहीच म्हणाल मात्र टाळ्याच तुम्हाला किती वाजत आहेत ते कळतंय असंही एकबोटे यांनी फडणवीसांना उद्देशून म्हटलं आहे. त्यानंतरही देवेंद्र फडणवीस यांनी हात जोडले. पुण्यात या प्रसंगाची चर्चा रंगली आहे.

यानंतर या कार्यक्रमात देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थितांना संबोधित केलं. आपण नवीन शिक्षण धोरण आणलं असून येत्या काळात शिक्षण पद्धतीत मोठे बदल झालेले बघायला मिळतील आणि जग वेगाने बदलतं आहे, पुढच्या बारा वर्षात आणखी गोष्टी बदललेल्या असतील असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

## राष्ट्रवादीने बळकावलेल्या कार्यालय इमारतीसाठी काँग्रेसचे आंदोलन




**सांगली :** राष्ट्रवादी काँग्रेसने गेल्या २४ वर्षापासून ताबा घेतलेल्या इमारतीचा ताबा परत द्यावा या मागणीसाठी इस्लामपूरमध्ये काँग्रेसने बुधवारी ठिय्या आंदोलन केले. चार दिवसांत या बाबतीत राष्ट्रवादीने निर्णय घेतला नाही तर मुंबईत खा. शरद पवार यांच्या बंगल्यासमोर ठिय्या आंदोलनाला बसू असा इशारा या ठिय्या आंदोलनाच्या माध्यमातून काँग्रेसचे तालुकाध्यक्ष जिंतेंद्र पाटील यांनी दिला.

काँग्रेसच्या कार्यालयाच्या इमारतीत २४ वर्षांपासून राष्ट्रवादीचे कामकाज केले जाते. महिन्याभरापूर्वी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी इस्लामपूर मध्ये घेतलेल्या एका मेळाव्यात काँग्रेस आणि राष्ट्रवादीमध्ये या कार्यालयावरून वाद असल्याचे समोर आले. मात्र महिनाभर राष्ट्रवादीकडून कार्यालय सोडण्याबाबत काहीही हालचाल न झाल्याने आता या जागेच्या मुद्द्यावरून काँग्रेस कार्यकर्ते आता आक्रमक झाले आहेत.

शिक्षण प्रसारक मंडळाचा उपक्रम

# पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना भरपेट भोजन मिळणार

## २४ हजार भाकरींचे वाटप

सुराज्य/अकलूज

येथील शिक्षण प्रसारक मंडळाच्या विविध शाखेतून जगद्गुरु तुकाराम महाराज व श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील वैष्णवांना सुमारे २४ हजार भाकरी व ११५ किलो बेसनाचे पिठले, ठेचा लोणचे अशा अस्सल ग्रामीण आस्वादाचे अन्नदान करण्यात येणार आहे.



यासाठी संस्थेचे ९ हजार२०० विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होत आहेत. शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते पाटील यांनी संस्थेच्या वतीने वैष्णवांना अन्नदान वाटपाची सुरुवात केली. शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, सदस्या कु. स्वरूपाराणी मोहिते पाटील, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या अन्नदानाचे वाटप होणार आहे. संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे दि. २४ जुन रोजी अकलूज येथे आगमन होत आहे. पालखींचा आदल्या दिवशीचा मुक्काम सराटी येथे असतो. सराटी व अकलूज हे अंतर केवळ तीन किलोमीटर असल्याने लाखो वैष्णव आदल्या दिवशीच मुक्कामाला अकलूजला येत असतात. आदल्या दिवशी मुक्कामास येणाऱ्या वैष्णवांना अन्नदान व्हावे, त्यांना घरगुती भोजनाचा आस्वाद मिळावा या हेतूने सन २०१५ पासून शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते पाटील यांनी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने अन्नदान वाटपाला सुरुवात केली. अन्नदान वाटपाचे हे ९ वे वर्ष असून याही वर्षी दि. २३जून रोजी दुपारी साडेतीन वाजता अकलूज- सराटी महामार्गावरील अकलूज हद्दीत शिक्षण प्रसारक मंडळ अन्नदान वाटप करणार आहे. या अन्नदानामध्ये शिक्षण प्रसारक मंडळाच्या सहा शाळा सहभागी झाल्या आहेत. श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील गृहविज्ञान महिला महाविद्यालयात, महर्षि शंकरराव मोहिते प्रशाला शंकरनगर, लक्ष्मीबाई कन्या प्रशाला शंकरनगर, महर्षि शंकरराव मोहिते प्रशाला प्राथमिक विभाग शंकरनगर, सदाशिवराव माने विद्यालय अकलूज, जिजामाता कन्या प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय अकलूज या ६ शाखेतून सुमारे ७ हजार विद्यार्थी अन्नदानात सहभागी होणार आहेत. यामध्ये १५ हजार भाकरी, ७० किलो पिठाचे बेसन पिठलं, ठेचा, लोणचं, कांदा असा ग्रामीण भोजनाचा आस्वाद देत आहेत. सुमारे १० हजार वारकरी या अन्नदानाचा लाभ घेणार आहेत.यावेळी मुख्याध्यापिका सौ सुनिता वाघ,श्री. संजय गळीतकर,प्रा.राहूल सुर्वे, अमोल फुले, सौ सविता गायकवाड, शिवाजी पारसे, पोपटराव देठे आदी उपस्थित होते.

**९,२००**
**विद्यार्थ्यांचा सहभाग**
दोन्ही पालखी सोहळ्यात संस्थेच्या वतीने सुमारे २४ हजार भाकरी, १२५ किलो बेसनचे पिठले, ठेचा, भाकरी ,लोणचे असे अस्सल ग्रामीण अन्नदान करण्यात येणार असून यासाठी ९ हजार२०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

संस्थेच्या सदाशिवनगर येथील कर्मवीर बाबासाहेब पाटील विद्यालय व जुनिअर कॉलेज यांच्या वतीने श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील मांडवे (ओढा) विसावा येथे दिनांक २४ जून रोजी सकाळी ९ वाजता पाच हजार भाकरी व २५ किलो बेसन, ठेचा, लोणचे असे अन्नदान होत असून यामध्ये सुमारे १हजार२०० विद्यार्थी सहभागी होत आहेत. मागील १८ वर्षापासून ही परंपरा सुरू आहे. वेळापूर येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील विद्यालय व अर्धनारी नटेश्वर विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील वैष्णवासाठी दि.२५ रोजी सकाळी १० वाजता ४ हजार भाकरी, २० किलो बेसन, ठेचा, लोणचं असे अन्नदान होत असून याकरिता १ हजार विद्यार्थी सहभागी होणार आहेत. प्रशालेचे सभापती सतीशराव माने देशमुख, अमरसिंह माने देशमुख, मुख्याध्यापक उरणे यावेळी उपस्थित राहणार आहेत.

## आषाढी वारीसाठी पंढरपुरात ८ हजार पोलिसांचा बंदोबस्त

सुराज्य/पंढरपूर



राज्य शासनाने दिलेली एसटी सवलत तसेच विविध कारणांमुळे यंदा आषाढीसाठी मोठ्या संख्येने भाविक येण्याची शक्यता असून त्यांच्या बंदोबस्तासाठी एकूण ८ हजार ३९५ पोलिसांचा बंदोबस्त तैनात ठेवण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

आषाढी वारीचा बंदोबस्त तसेच पाहणीसाठी आलेल्या सरदेशपांडे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी भोसले, शहर पोलीस निरीक्षक अरूण फुगे आदी उपस्थित होते. आषाढी वारीसाठी यंदा १२ लाखाहून अधिक भाविक हजेरी लावतील असा प्रशासनाचा अंदाज आहे. यासाठी ५ हजार ११७ पोलीस अंमलदार, ४२८ पोलीस अधिकारी, २ हजार ८५० गृहरक्षक दल कर्मचारी, ४ एसआरपीएफ कंपन्या व दहा बॉम्ब शोधक पथक असा एकूण ८ हजार ३९५ पोलिसांचा बंदोबस्त तैनात असणार आहे.

या काळात विशेषतः एकादशी दिवशी गर्दीचे नियोजन करण्यासाठी व गर्दी टाळण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात येणार असल्याचे सरदेशपांडे यांनी सांगितले. चेंगराचेंगरीचे प्रसंग निर्माण होऊ नयेत यासाठी वाळवंट पासून ते महाव्दार चौकापर्यंत तीन टप्प्यात भाविकांना सोडण्यात येणार आहे. वाळवंटापासून अडीच हजार स्क्वेअर फुटाचा एक टप्पा केला जाणार आहे. मंदिर परिसरात सहा माउली पथक, अनिरूध्द बापू यांचे स्वयंसेवक असणार आहेत. यांना विशेष गणवेष दिला जाणार असून भाविकांनी जागेवर थांबू नये, सेल्फी काढू नये यासाठी कार्यरत राहणार आहेत. भाविकांकडून अव्वाच्या सव्वा पैसे घेणाऱ्या रिक्षा चालकांवर देखील कारवाई करू असे आश्वासन सरदेशपांडे यांनी दिले. मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्ग येथे भाविकांची तृतीयपंथीयांकडून अडवणूक होते. त्यांची देखील एक बैठक घेतली असून पुन्हा त्यांना याबाबत सूचना करणार असल्याचे सांगितले.

**नव्याने १३५ सीसीटिव्ही कार्यान्वित**
चोरांवर लक्ष ठेवण्यासाठी नव्याने १३५ सीसीटिव्ही लावण्यात आले असून पंढरपूर नगरपरिषद व मंदिर समितीचे १६३ कॅमेरे देखील तैनात आहेत. अशा जवळपास तीनेश सीसीटिव्ही व्दारे वारीवर पोलिसांच्या विशेष पथकाचे लक्ष असणार आहे. तसेच चार ड्रोन कॅमेर्यातून देखील पाहणी केली जाणार आहे. नवीन बसस्थानक, चौफाळा, महाव्दार चौक, वाळवंट येथे देखील कॅमेर्यांची संख्या वाढवली जाणार असल्याचे सरदेशपांडे यांनी सांगितले.





# शेगावीच्या राणाचे जिल्ह्यात उत्साहाने स्वागत



### आज शहरात होणार जल्लोषात स्वागत

सुराज्य/सोलापूर

श्रीक्षेत्र शेगाव येथून आषाढी वारीच्या सोहळ्यासाठी पंढरपूरकडे पायी निघालेल्या संत गजानन महाराजांच्या पालखी सोहळ्याचे मंगळवारी सोलापूर जिल्ह्यात उळे (ता. द.सोलापूर) येथे सायंकाळी पाच वाजता आगमन झाले.

गण गण गणात बोतेच्या गजरात ग्रामस्थांनी आणि मान्यवरांनी या पालखीचे जल्लोषात स्वागत केले. स्वागतानंतर पालखी उळेगावीच मुक्कामास विसावली. बुधवारी सोलापूर शहरात पालखीचे आगमन होणार आहे.

श्री गजानन महाराजांच्या पालखीचे यंदाचे ५४ वे वर्ष आहे. शेगाव ते पंढरपूर असे जवळपास ५०० किलोमीटर अंतर पायी चालत ही वारी पांडुरंगाच्या भेटीला जात असते. जवळपास २९ दिवसांचा पायी प्रवास करीत या पालखीचे सोलापूर जिल्ह्यात आगमन झाले. उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यातून ही पालखी सोलापूर जिल्ह्यात दाखल झाली. जिल्ह्याच्या सीमेवर या पालखीचे स्वागत करण्यात आले. यावेळी प्र.जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, आ. सचिन कल्याणशेट्टी, माजी आ. सिद्धाराम म्हेत्रे, काँग्रेस कार्याध्यक्ष सुरेश हासापुरे, भाजप नेते शहाजी पवार, सहाय्यक जिल्हाधिकारी मनीषा आव्हाळे, प्रांताधिकारी पडदूने, तहसिलदार राजशेखर लिंबारे, तहसीलदार सैपन नदाफ यांच्यासह व अधिकारी उपस्थित होते. मंगळवारी रात्री पालखीचा मुक्काम उळेगाव येथे झाला. रात्री कीर्तन, पूजा व विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले.

गुरूवार २२ जून रोजी पहाटे ही पालखी सोलापूर शहरात दाखल होणार आहे. पाणी गिरणी येथे पालखीच्या स्वागताची तयारी करण्यात येत आहे. शहरात दोन दिवस पालखीचा मुक्काम असणार आहे.

**पालखीसोबत हजार वारकरी**
गजानन महाराजांच्या या पालखीसोबत सुमारे एक हजार वारकरी आहेत. या पालखीचे सारथ्य मानाचे अश्व करीत आहे. त्यानंतर पांढऱ्याशुभ्र पोशाखातील भगव्या पताकाधारी वारकरी एका रांगेत चालत होते. त्यानंतर टाळ वाजवीत आणि विठूरायचा जयघोष करत असलेले तरुण वारकरी देखील मोठ्या उत्साहात वारीत सहभागी आहेत. रस्त्याच्या दोन्ही बाजूने उभे असलेल्या भाविकांनी नतमस्तक पालखीचे होऊन दर्शन घेतले.

**रुसलेला वरुणराजा प्रसन्न होऊ दे : आ.कल्याणशेट्टींची प्रार्थना**
विधानसभेचा प्रमुख म्हणून मी या पालखीचे स्वागत केले. गजानन महाराजांच्या पालखीचे स्वागत करण्याचे भाग्य आम्हाला लाभले आहे. महाराजांच्या पादुकांचे दर्शन सोलापूर जिल्ह्यात घेण्याचे भाग्य आम्हाला लाभले, आम्ही स्वतःला परम भाग्यश्याली समजतो. गजानन महाराज आणि विठुरायाला रुसलेला वरुणराजा प्रसन्न होऊ दे हेच मागणे मागितले अशी प्रतिक्रिया आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली.

**शेतकरी समाधानी व्हावा हेच मागणे : पवार**
आम्ही मोठ्या उत्साहात या पालखीचे स्वागत करत असतो. कित्येक वेळा पावसात भिजत आम्ही या पालखी सोहळ्यात सहभागी झालो. पण यंदाच्या वर्षी कडक ऊन आहे, सगळीकडे कोरडे पडले आहे. ही वारी पंढरपुरात पोहोचण्याआधी धो धो पाऊस पडावा आणि शेतकरी समाधानी व्हावा हीच पांडुरंग आणि गजानन महाराजांकडे आमची प्रार्थना आहे, अशी प्रतिक्रिया भाजप नेते शहाजी पवार यांनी दिली.

## वारकऱ्यांना आता शासनातर्फे विमा संरक्षण मिळणार

सुराज्य/सोलापूर



पंढरपूरच्या आषाढी वारीत सहभागी झालेल्या वारकऱ्यांसाठी शासनातर्फे विमा संरक्षण देणारी विठ्ठल रुक्मिणी वारकरी विमा छत्र योजना लागू करण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे.

लाखो वारकऱ्यांना यामुळे शासनाच्या खर्चाने विमा संरक्षण मिळणार आहे. वारीच्या ३० दिवसांसाठी हे विमा संरक्षण असेल. यामध्ये एखाद्या वारकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांस ५ लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्यात येईल. दुर्घटनेत कायमचे अपंगत्व किंवा विकलांगता आल्यास १ लाख रुपये देण्यात येतील. अंशतः अपंगत्व आल्यास ५० हजार रुपये तसेच वारीच्या दरम्यान आजारी पडल्यास औषधोपचारासाठी ३५ हजार रुपयापर्यंतचा खर्च मिळेल. याबाबत शासन निर्णय प्रसिध्द करण्यात आला असून मदत व पुनर्वसन विभागामार्फत ही योजना राबविण्यात येईल. वारीमध्ये कुटुंबियांना आर्थिक मदत मिळावी या उद्देशाने मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी हा निर्णय घेतला आहे.

## सोपान महाराज, चांगावटेश्वर महाराज पालखी सोहळा रविवारी बोंडलेत मुक्कामी

पालखी सोहळ्याच्या तयारीच्या कामाला वेग

सुराज्य/वेळापूर

आषाढी वारी निमित्त पंढरीच्या पांडुरंगाला भेटीसाठी जाणारे पालखी सोहळे बोंडले (ता. माळशिरस) येथून एकत्रित जात असून त्याच्या तयारीच्या कामाला बोंडले ग्रामपंचायतीच्या वतीने सुरुवात केली आहे. २५ जून रोजी संत सोपान महाराज पालखी सोहळा व संत चांगावटेश्वर महाराज पालखी सोहळा हे दोन पालखी सोहळे मुक्कामासाठी बोंडलेत आहेत.

२६ जून २०२३ रोजी संत तुकाराम महाराज पालखी सोहळा सकाळी ११ वाजता



धावा होऊन सकाळी ११.३० वाजता बोंडले चौक येथे पालखी सोहळ्याचे तर १२.०० च्या सुमारास संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे संत ज्ञानेश्वर मार्गावर बोंडले येथे सरपंच विजयसिंह माने देशमुख व बोंडले ग्रामस्थ यांच्यावतीने स्वागत केले जाणार आहे. या सोहळ्यांची बोंडले ग्रामपंचायत यांच्या वतीने तयारी सुरु करण्यात आली आहे. बोंडले गावातील सार्वजनिक स्वच्छता पालखी मार्गावरील व गावातील अंतर्गत रस्त्याची डागडुजी करण्यात आलेली आहे. रस्त्याच्या दुतर्फा असणारी काटेरी झाडे काढण्यात आली आहेत. त्याचबरोबर आपत्ती व्यवस्थापन कक्षासाठी मंडप उभारण्याची तयारी सुरू आहे. या माध्यमातून उपकेंद्र बोंडले, आरोग्य विभाग, डीसीसी बँकेजवळ तसेच ज्ञानेश्वर मार्गावर पालखी विसावा कक्ष आदी ठिकाणी मंडप उभारणी करण्यात येणार आहे. बोंडले येथे मुक्कामी असणाऱ्या पालख्यांच्या पाण्याची सोय, व सार्वजनिक शौचालयाची पांढरे झेंडे लावून सोय करण्यात आली आहे. कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी कचरा संकलन केंद्र उभारण्यात येणार आहे, आरोग्य विभागाच्या सहकार्याने मोफत सॅनिटरी पॅड वाटप केले जाणार आहे. त्याचबरोबर वारकऱ्यांना आरोग्य विभागाच्या वतीने मोफत तपासणी व औषध गोळ्या वाटप केले जाणार आहे.

करमाळा पंचायत समितीचा उपक्रम

## वारकऱ्यांसाठी यांत्रिक मसाज सेवा सुरू

सुराज्य/सोलापूर

वारकऱ्यांसाठी करमाळा पंचायत समितीच्या वतीने यांत्रिक मसाज सेवा सुरू करण्यात आली आहे. चालून थकल्यावर विसावा आणि मुक्कामाच्या ठिकाणी ही मसाज यंत्राने पाऊलांना मसाज करून दिला जात आहे. तेलाने मालिश करून दिली जाते.

पुढील मुक्कामाच्या किंवा विसाव्याच्या ठिकाणी गेल्यावर पाऊलांना लावण्यासाठी आयोडेक्स किंवा झंडू बामची सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. करमाळा पंचायत समितीने आषाढी वारीच्या निमित्ताने पालखी सोहळ्यात पायी चालत पंढरपूरकडे निघालेल्या भाविक भक्तांसाठी प्रत्येक मुक्कामाच्या व विसाव्याच्या ठिकाणी सहा मसाज यंत्राने पाय चेपून देण्याची आणि आठ ते दहा लोक पायांना तेलाने मालिश करण्यासाठी नेमले आहेत. पालखी सोहळा पुढील मुक्कामाच्या ठिकाणी अथवा विसाव्याच्या ठिकाणी पोहोचेपर्यंत ही व्यवस्था करण्यात आली आहे वैद्यकिय कक्षाच्या ठिकाणी डायक्लोफेनीक मलम दिला जात आहे. पेन किलर मलम सारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

## वारकऱ्यांना रस्त्याच्या नियमाबाबत होणार प्रबोधन

सुराज्य/अकलूज

संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील पायी चालणाऱ्या वारकऱ्यांना जिल्हा रस्ता सुरक्षा समिती व उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून पायी चालणाऱ्या वारकऱ्यांचे प्रबोधन करण्यासाठी जिल्हा सुरक्षा समिती व उपप्रादेशिक परिवहन विभाग अकलूजच्यावतीने ठिक ठिकाणी फलक लावण्यात आले आहेत.

पालखी सोहळ्यात पायी चालताना वारकऱ्यांचे छोटे मोठे अपघात टाळण्यासाठी जिल्हा रस्ता सुरक्षा समिती व उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून विशेष मोहीम हाती घेण्यात आली असून या अंतर्गत पालखी मार्गावर प्रबोधनात्मक फलक लावण्यात आले आहेत.

या फलकांवर रस्त्यावरून चालताना फुटपाथवरून चालावे, फुटपाथ नसलेल्या ठिकाणी ज्या दिशेने वाहने येतात त्या दिशेने चालावे जेणेकरून वाहन आपल्याला दिसेल याबरोबरच सार्वजनिक वाहनांचा वापर करा, दारू पिऊन वाहन चालवू नका, हेल्मेटचा वापर करा, सीटबेल्ट चा वापर करा याबाबत जनजागृती करण्यात आली आहे.

# वेळापूर ग्रा.पं.तर्फे माऊलींच्या पालखी सोहळ्याच्या तयारी जोरात

सुराज्य/वेळापूर

श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा दिनांक २५ जून२०२३ रोजी वेळापूर नगरीत मुक्कामी येत असून पालखी सोहळयासह वारकऱ्यांच्या सेवेसाठी राष्ट्रवादीचे नेते उत्तम जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली वेळापूर ग्रामपंचायतीच्या वतीने तयारीच्या कामाला वेगाने सुरुवात केली आसल्याची माहिती वेळापूर ग्रामपंचायतीचे सरपंच रजनीश बनसोडे यांनी दिली.

यावेळी उपसरपंच तानाजी चव्हाण, गटनेते संजय मंडले, डॉक्टर स्नेहलताई जीवन जानकर, नानासाहेब मुंगुस्कर, हनुमंत वायदंडे, प्रियंका आडत, सीमा खाडे, सिमरन मुलाणी, अंजना माने, विमल जाधव, छाया साठे, ग्रामपंचायत सदस्य आदी



उपस्थित होते. पालखी सोहळ्या बरोबर लाखो वारकरी येत असून या वारकरी बांधवांची कोणतीही अडचण येऊ नये यासाठी पालखी मैदानाची मुरूम टाकून लेव्हलिंग करण्यात आली आहे मैदाना लगतची सर्व स्वच्छता करण्यात आली आहे. शहरातील व वाड्या वस्त्यावरिल काटेरी झुडपे काढण्याचे काम सुरू आहे. वाड्यावर जाणाऱ्या रोडवर खड्डे असतील त्या ठिकाणी मुरूम टाकण्यात येणार आहे. गटारींची स्वच्छता करण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. मॉलिथिऑन पावडर टीसीएल पावडर व बायो कल्चर आदी आरोग्य विषयक साहित्य खरेदी करण्यात आले आहे. त्याचबरोबर शहरातील व वाड्या वस्त्यावरिल दिवाबत्ती ची कामे वेगाने सुरू आहेत. सोहळा मुक्कामाच्या ठिकाणी भरपूर प्रकाश योजना करण्यात येणार आहे. बॅरीकेटींग लावून पादुकांचे दर्शन सुलभ होण्यासाठी सोय करण्यात आली आहे.

**लवकरच पालखी सोहळ्याच्या तयारी पूर्ण होईल : बनसोडे**
पालखी तळावर दोन पाणीपुरवठा करणाऱ्या टाकीच्या माध्यमातून वारकऱ्यांना स्टँड पोस्ट १२ च्या माध्यमातून स्वच्छ पाणीपुरवठा केला जाणार आहे. याबरोबरच पालखी सोहळ्याची विविध आरोग्य विभाग, निरा कालवा पाणी पुरवठा, पोलिस खाते, महावितरण विभाग, या विभागांचीही कामे वेगाने सुरू असून लवकरच पालखी सोहळ्याच्या तयारी पूर्ण होणार असल्याचे वेळापूर सरपंच बनसोडे यांनी सांगितले.